

**अंगकांती तेजोमय**
**जणू बुद्धीचा सागर**
**मायेचा साई अंबर**
**कल्याणा सदा तत्पर**

बाबांबद्दल कितीही लिहिले तरी वाणी अपुरीच पडेल. बाबांची लहर केव्हा फिरेल, हे सांगता येणे कठीणच होते. आम्ही मुलांनी कितीही गलका केला तरी ते रागवत नसत. आम्ही मुले त्यांना जशी प्रिय तशीच शेळी, मेंढी, कुत्रे हे सर्व त्यांचे सोबती असत. बाबांचे अंतःकरण इतके हळवे, दयाळू, मायाळू होते की, बायजाबाईंनी त्यांच्यासाठी आणलेली भाकरी सर्व प्राण्यांना ते तुकडा-तुकडा करून वाटून टाकीत असत. साक्षात् करता-करविता परमेश्वर भूतलावर अवतरला होता. बाबांना लहर आली की, ते लेंडीबागेत जाऊन बसत. तेथे झाडांना पाणी घालत. कधी कधी आकाशाकडे पहात बसत. अशा या योग्याला कोण जाणणार !

**परब्रह्म तो परमेश्वर**
**सर्वांचा तारक हा ईश्वर**
**कृपा दया सदा आम्हावर**
**माय-माऊली ही आमुची**

लहर आली की द्वारकामाईत धूनीजवळ जाऊन एकटक लावून बसत असत.

**असा योगी मी पाहिला डोळा**
**काय सांगू उमाळा वात्सल्याचा**
**सर्व जग आपुले मानूनि चालले**
**त्यांना माझे वंदन हे पहिले**

असे बाबा मी लहानपणी पाहिले आणि ती देहमूर्ती माझ्या डोळ्यांसमोर आहे. आज जे शिरडीचे वैभव आहे ते त्यावेळी नव्हते. बाबांचा आशीर्वाद आमच्या मस्तकावर कायम आहे.

**त्यांची कृपा आम्हावरी**
**म्हणूनि संसारी सुखी आम्ही**
**नेत्रांनी सतत पहात आहोत**
**दिव्य रूप तुझे हे साई !**

**- शांताबाई जोशी**
दादर (प.), मुंबई.

□□□

## जगणार नाही वाटताना मुलगा वाचला !

**मा**झा मुलगा शामसुंदर हा त्यावेळी चार वर्षांचा होता. गावात देवीची भयंकर साथ चालू होती. या देवीच्या साथीत शामसुंदर सापडला. जगण्याची अजिबात आशा नव्हती. केव्हाही मरेल असे वाटत होते. तीन दिवस एकसारखे जागरण झाले. त्यामुळे तिसऱ्या दिवशी रात्री दहा वाजता माझा नकळत डोळा लागला. श्री साईंनी स्वप्नात येऊन मला, ''भिऊ नकोस'', असा आशीर्वाद दिला. मी झोपेतून उठून एक उदबत्ती पेटवून अंगारा लावला. याअगोदर एक वैद्य येऊन नऊ वाजता निघून गेले व त्यांनी मुल जगत नाही म्हणून सांगितले. माझी आई, पत्नी वगैरे घरातली सर्व जागीच होती. तीन दिवसांपासून बंद असलेली वाचा येऊन मुलगा दूध मागू लागला. आई म्हणाली की, मरतेवेळची इच्छा आहे. दूध द्या. त्यानुसार गाईचे दूध दिले. मुलगा बोलू लागला, मला साधू दिसतो.

मी त्याला विचारले की, तो कसा दिसतो. त्याने सांगितले की, त्याला दाढी आहे, डोक्यावर हिरवी पट्टी आहे. मी बाबांना प्रार्थना केली की, मुलगा जगला तर त्याला मी तुमच्या दरबारात आणीन. आणि आश्चर्य ! सकाळ झाली तसा मुलगा चांगला बोलू लागला.

जे वैद्य रात्री पाहून गेले होते ते सकाळी आले व घडलेला प्रकार पाहून आश्चर्यचकित झाले. माझी परिस्थिती फार बिकट होती. नवस कसा फेडावा, हा विचार करीत असताना दुसऱ्या दिवशी एका मित्रामुळे आधार मिळाला. पाचशे रुपये नफा झाला. नवस फेडण्याकरिता मी, मुलगा व पत्नी साईंच्या दर्शनास गेलो. एक-दोन दिवस राहण्याचा विचार होता. परंतु सात-आठ दिवस शिरडी सोडण्याची इच्छाच झाली नाही.

त्या अवधीत एक दिवस लक्ष्मीबाई शिंदे यांच्या झोपडीवर गेलो असता आईने एक रुपया मागितला. मी तो दिला. परंतु, आईने बाबांच्या नऊ नाण्यांच्या फ्रेमवरून उतरवून तो रुपया मला परत केला. मी परत नको सांगितले असता आईने ते बाबांचे आशीर्वाद आहेत. तू अडचणीत आहेस. त्याची पूजा करावी. कर्ज फिटेल. सुखी व्हाल, असे सांगितले. पुढे चार महिन्यांत माझी इतकी प्रगती झाली की, मी श्रीमंत माणसांच्या बरोबरीने बसू लागलो. आतापर्यंत मी फार सुखी आहे. मुलाचे लग्न झाल्यावर त्याला लगेच शिरडीला पाठविले. बाबांच्या कृपेने दोन नातू झाले आहेत. दररोज साईदर्शन केल्याशिवाय व 'साईमाहात्म्य' वाचल्याशिवाय मी घराबाहेर पडत नाही. चार-पाच वेळा शिरडीला साईदर्शन केले आहे. आता माझे वय ८३ वर्षांचे झाले आहे. ''श्री साई रोगहराय नमः'' ही प्रार्थना रोज सकाळी करतो. अनेकविध साईअनुभव मी अनुभवले आहेत. वयोमानानुसार थकलो असलो तरी पूजा-अर्चा, नामस्मरण मात्र कधीही चुकत नाही. ही साईंचीच कृपा आहे. 'साईलीला' वेळेवर आली नाही तर त्याची सारखी आठवण येत राहते.

**- खेमराज मुलतानचंद पनपालिया**
मु. पो. आलेगांव,
ता. पातुर, जि. अकोला.

□□□



## उदीचा महिमा

**मी** एक ८५ वर्षांचा वृद्ध आहे. मला १९५४ पर्यंत श्री साईबाबांची माहिती नव्हती. त्यावेळी मी परिस्थितीने फारच गांजलो होतो. काही मार्ग दिसत नव्हता. अशा वेळी माझी मेहुणी निर्मला पु. कुलकर्णी व साडू पुरुषोत्तम ना. कुळकर्णी यांनी धीर देऊन श्री साईमाहात्म्याची पोथी व श्री साईबाबांची तसबीर देऊन रोज पूजा-पाठ करण्यास सांगितले. त्याप्रमाणे आम्ही रोज तसबिरीची पूजा व साईमाहात्म्य पोथीचा पाठ करीत होतो.

१९५६ मध्ये श्री साईबाबांची कृपा होऊन माझी आर्थिक परिस्थिती सुधारली व त्या वर्षीच्या मे महिन्यात प्रथम शिरडीस जाण्याचा योग येऊन आम्हाला श्री साईसमाधीचे दर्शन घडले. आम्हाला अतिशय आनंद झाला. त्यानंतर आम्हाला संसारात पुष्कळ संकटे व जिवावरची दुखणी आली. त्या प्रत्येक वेळी आम्ही बाबांचे स्मरण करून उदी लावली आणि संकटातून पार पडलो. अजूनही आम्ही संकटकाळी बाबांचा धावा करून उदी लावतो आणि आम्हाला बरे वाटते. मी रोज साईमाहात्म्य वाचतो. त्यामुळे माझ्या मनाला शांती लाभते. मी साईलीलेचा व संस्थानच्या भक्तमंडळाचा कायम सभासद असल्यामुळे मला प्रसाद व उदी मिळते. आमच्यावर जशी साईबाबांची कृपा झाली तशीच सर्वांवर होवो, ही साईचरणी प्रार्थना.

**- मोरेश्वर का. देशमुख**
तळाशेत, जि. रायगड.

शिरडी वृत्त

# संस्थानतर्फे मोफत होमिओपॅथीक शिबीर संपन्न



**श्री** साईबाबा संस्थानतर्फे दिनांक १९ मे, २००२ रोजी मोफत होमिओपॅथीक सर्वरोग शिबीर आयोजित करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन संस्थानचे विश्वस्त श्री. भास्करराव बोरावके यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटनाच्या प्रसंगी सर्वश्री शांताराम मिराणे, देवराम पवार, मधुकर दंडवते, शामसुंदर शहाणे, डॉ. अजेय गर्जे व सौ. सुनीता क्षीरसागर आणि कार्यकारी अधिकारी श्री. भाऊसाहेब वाकूचौरे, त्याचप्रमाणे सर्व प्रशासकीय अधिकारी, रुग्णालय वैद्यकीय अधीक्षक व रुग्णालयातील सर्व कर्मचारी उद्घाटनप्रसंगी उपस्थित होते.

उद्घाटन सोहळा संपल्यानंतर लगेच रुग्णतपासणी सुरू करण्यात आली.

शिबिरातील रुग्णांवर उपचार करण्यासाठी तज्ज्ञ डॉक्टर्स म्हणून मुंबई येथून १३, नाशिक येथून २, संगमनेर येथून १, जुन्नर येथून १, श्रीरामपूर येथून १, कोपरगाव येथून १, चांदवड येथून १ असे एकूण २० डॉक्टर्स उपस्थित होते.

शिबिरासाठी शिरडी परिसरातील व महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून रुग्ण आले होते. शिबिराला आलेल्या रुग्णांसाठी संस्थानतर्फे मोफत तपासणी, औषधोपचार, तसेच चहापान, न्याहारी इत्यादी सोय करण्यात आली होती. शिबिरात रुग्णतपासणी सकाळपासून सायंकाळपर्यंत चालू होती. शिबिरांतर्गत तपासणीसाठी १० व औषधवाटपासाठी ४ असे एकूण १४ कक्ष उभारण्यात आले होते.

या मोफत होमिओपॅथीक सर्वरोग शिबिराचा ११२१ रुग्णांनी लाभ घेतला. शिबीर यशस्वीरीत्या पार पडण्यासाठी श्री साईनाथ रुग्णालयाचे होमिओपॅथीक विभागाचे तज्ज्ञ डॉक्टर डॉ. बाकलीवाल यांनी विशेष परिश्रम घेतले.

साईबाबा मनुष्यदेहात असताना त्यांच्या विविध तत्त्वांपैकी रुग्णसेवा हे एक त्यांचे मुख्य तत्त्व होते. ही रुग्णसेवा ते रुग्णाला उदी व तीर्थप्रसाद देऊन करीत असत. साईबाबांचे हे तत्त्व समोर ठेवून संस्थान वेगवेगळी वैद्यकीय शिबिरे घेऊन आलेल्या रुग्णांवर मोफत उपचार करून त्यांना औषधे देण्याचे मोलाचे कार्य करीत असते.

संस्थानतर्फे वर्षभरात कृत्रिम भिंगरोपन शिबीर, जयपूर फुट शिबीर, प्लॅस्टिक सर्जरी शिबीर, बालरोगतपासणी शिबीर, कान-नाक-घसा-तपासणी शिबीर ही वैद्यकीय शिबिरे घेतली जातात. तसेच, शिरडी परिसरातील ग्रामीण भागांत रुग्णांना वैद्यकीय सेवा मिळावी म्हणून वर्षभर आठवड्यातून दोनदा फिरते वैद्यकीय पथक पाठविले जाते. तेथेही रुग्णांना मोफत तपासले जाते व औषधोपचार करण्यात येतो. आवश्यक त्या रुग्णांना पुढील उपचारासाठी श्री साईबाबा संस्थानच्या रुग्णालयात बोलविण्यात येते. त्याचप्रमाणे हृदय-शस्त्रक्रिया व त्यानंतरचे उपचार, मूत्रपिंड-शस्त्रक्रिया व त्यानंतरचे उपचार, मेंदूची शस्त्रक्रिया व त्यानंतरचे उपचार, कर्करोगासंबंधीचे उपचार - शस्त्रक्रिया व त्यानंतरचे उपचार, रक्तासंबंधीचे आजार (उदा. हिमोफेलिया) आणि नेत्ररोगासंबंधीच्या शस्त्रक्रिया (ज्या संस्थानच्या रुग्णालयात होऊ शकत नाहीत) व त्यानंतरचे उपचार इत्यादी आजारांसाठी संस्थानतर्फे वर्षाला रु. ३ कोटी वैद्यकीय अनुदान म्हणून वाटले जातात.

❑❑❑

# अभिप्राय

'साईलीला'चा जानेवारी-फेब्रुवारीचा अंक मिळाला. मुखपृष्ठ अत्यंत मोहक आणि आकर्षक आहे. मांडणी खूपच चांगली आहे. अंकातील सर्वच लेख वाचनीय व मनन करण्यासारखे आहेत.

'साईलीला'ची अशीच प्रगती होत राहो, ही साईचरणी प्रार्थना.

**- बंडू नागनाथराव आगदिघे**
गंगाजी बापू मंदिराजवळ,
बुधवार पेठ, वसमत,
मु. पो. ता. वसमत,
जि. हिंगोली (मराठवाडा).

जानेवारी-फेब्रुवारी, २००२ चा साईलीला अंक संत श्री गजानन महाराज (शेगांव) यांच्या प्रकट दिनाच्या दिवशीच आला तेव्हा श्री साईबाबांची किमया न्यारी !

मुखपृष्ठावर श्री साईबाबा - मलपृष्ठ श्री गणेशाचे. सर्वांगसुंदर अंकाची सजावट आहे. त्यात डॉ. बाळाजी आठवले (सनातन प्रभात) यांचे देवघर या चिंतनामुळे माहिती मिळाली.

दिवसेंदिवस अंकाची शोभा वाढत आहे. त्या त्या सणाला, तिथीला किंवा उत्सवाला त्या त्या देवतेची माहिती वैशिष्ट्यपूर्णरीत्या सादर करून विविध संतांची शिकवण प्रसारित करीत असल्याबद्दल संपादक श्री. द. म. सुकथनकर व श्री. विद्याधर ताठे, कार्यकारी संपादक यांचे अभिनंदन. संस्थान व्यवस्थापन व प्रशासन यांच्या अथक प्रयत्नाने शिरडीचे व साईलीला अंकाचे स्वरूप फारच चांगल्या प्रकारे होत आहे.

अशीच श्री साईबाबांची सेवा आपणाकडून घडो व आपल्या हातून आणखी चांगले कार्य घडो,

ही साईचरणी प्रार्थना.

**- श्रीकांत बापूजी निकुंब**
लष्करवाडी, जालगांव,
ता. दापोली, जि. रत्नागिरी.

'साईलीला'चा जानेवारी-फेब्रुवारी, २००२ चा अंक मिळाला. हा अंक अध्यात्माची ओळख करून देणारा वाटला. अग्रगण्य दैवत 'श्री गणेश' - उपासना, वंदना, तसेच देवघरातील देवतांची स्थाने याबद्दलची माहिती मिळाली. 'साई उवाच' या सदरातील साईबाबा व त्यांचे भक्त यांच्यातील भक्तिप्रेम वाचनीय आहे. ''कोणताही धर्माचार्य दहशतवादाचे समर्थन करू शकत नाही'', हा लेख सुरेख वाटला. त्याचप्रमाणे श्री गोंदवलेकर महाराज, स्वामी स्वरूपानंद, महात्मा बसवेश्वर यांच्या आध्यात्मिक व सामाजिक कार्याची जी ओळख करून दिली आहे ती अवर्णनीय आहे. अनुभवांतून बाबांच्या अस्तित्वाची प्रचीती येते. असा आपला हा 'साईलीला' अंक भक्तांकरिता ज्ञानाचा प्रसार करीत राहो, हीच साईचरणी नम्र प्रार्थना.

**- संगीता ल. खेडेकर**
वृंदावन सोसायटी, ठाणे (प.).

मी साईलीला नियतकालिकाचा सभासद आहे. आपण पाठविलेला जानेवारी-फेब्रुवारी, २००२ चा अंक मिळाला. मुखपृष्ठावरील श्री साईबाबांचा ॐ वर साकारलेला फोटो अत्यंत सुंदर व विलोभनीय आहे.

या अंकातील ''कोणताही धर्माचार्य दहशतवादाचे समर्थन करू शकत नाही'', हा लेख आजच्या स्थितीचे दर्शन घडवितो.

डॉ. बाळाजी आठवले यांचे 'देवघर' (चिंतन) प्रत्येक कुटुंबास मार्गदर्शन करणारे आहे. तसेच, डॉ. सी. ग. देसाई यांनी मराठीत अनुवादित केलेले 'सार्थ श्री गणेश सूक्त व कवच'' अत्यंत प्रभावी असून आजच्या धावपळीच्या जीवनात शक्ती प्रदान करते.

'साईलीला'द्वारे साईभक्तांना असेच मार्गदर्शन मिळत राहो, हीच श्री साईचरणी प्रार्थना.

**- वसंत कोकाटे**
प्लॉट ९९, स्वप्नशिल्प,
पावनभूमी, सोमलवाडा,
वर्धा रोड, नागपूर.

मी 'साईलीला' नियतकालिकाचा दहा वर्षांपासून वार्षिक वर्गणीदार आहे. मला अंक पोस्टाने दर दोन महिन्यांनी नियमित मिळतात. साईलीला नियतकालिकातील सर्व लेख माहितीपूर्ण व वाचनीय असतात. त्यामुळे मी आवडीने सर्व लेख वाचतो. मी दिनांक ३१ मार्च, २००२ रोजी शिरडी येथे श्री साईबाबांच्या दर्शनास सहकुटुंब गेलो होतो. दुपारची साईबाबांची आरती अत्यंत प्रसन्न वातावरणात झाली. भक्तगण शिस्तीने रांगेत उभे राहून साईबाबांचे दर्शन घेताना दिसले. संस्थानने माफक दरात जेवण, चहा-कॉफी, फराळाची सोय केली आहे. त्याचा मी लाभ घेतला. याशिवाय संस्थानने माफक दरात राहण्याची उत्तम

व्यवस्था केली अहे. त्यामुळे भक्तांना मुक्कामात कोणताच त्रास होत नाही. मी साईबाबा संस्थान, शिरडीच्या भक्तमंडळाचा आजीव सभासद आहे. संस्थानकडून मला शिरडी येथे साजऱ्या होणाऱ्या उत्सवांची निमंत्रण-पत्रिका व उदी-प्रसाद पोस्टाने नियमितपणे मिळतो. त्यामुळे माझे मन प्रसन्न राहते व आरोग्यदेखील साईबाबांच्या कृपेने चांगले राहते. दरवर्षी मी साईबाबांच्या दर्शनास येत असतो. यापूर्वी भक्तमंडळाच्या आजीवन सभासदांना संस्थानकडून वार्षिक डायरी मिळत होती. संस्थानने आर्थिक अडचणीमुळे दरवर्षीची डायरी पाठविणे बंद केले. डायरीऐवजी साईबाबांचे लहान कॅलेंडर दरवर्षी पोस्टाने संस्थानच्या भक्तमंडळाच्या सभासदांना पाठवावे, अशी माझी संस्थानला नम्र विनंती आहे. साईलीलाची व संस्थानची उत्तरोत्तर प्रगती होत राहो, ही साईचरणी नम्र प्रार्थना.

**- वि. दा. पत्तीवार**
सरस्वती कॉलनी (प.),
जनता बाजारसमोर, औरंगाबाद.

मार्च-एप्रिल, २००२ चा साईलीला अंक मिळाला. वाचला. जसजसे वय वाढत आहे तसतशी मोरवळ्याप्रमाणे त्याची गोडी वाढत आहे. अंकाची आम्ही आतुरतेने वाट पाहतो. संपादकीय मनात घर करणारे आहे. प्रामाणिक विश्वस्त व कार्यकुशल नेतृत्व हे संस्थेचे वैभव असते, ते येथे पहावयाला मिळते. मला मिळालेले अंक मी हॉलमध्ये टेबलावर ठेवतो. आलेले पाहुणे ते वाचतात. वाचताना त्यांना चहा घ्यायचीसुद्धा आठवण राहत नाही. साईलीलाचे भविष्य उज्ज्वल आहे. कार्यकुशलतेमुळेच हे द्वैमासिक संपन्न होत आहे. या द्वैमासिकाचे लवकरच मासिकात रूपांतर होवो, हे साईचरणी मागणे आहे. भक्तवत्सल साईबाबा माझी मागणी नजिकच्या काळात मान्य करणारच, असा मला आत्मविश्वास आहे.

**- वि. वि. देवगावकर**
एन-२, चैतन्यनगरी, वारजे, पुणे.

जानेवारी-फेब्रुवारी २००२ हा नववर्षाचा 'श्रीगणेशा' करणारा अंक म्हणजे साईभक्तांना अनुपम उपहार आहे. 'संपादकीय' आत्मचिंतन करायला लावणारे आहे. डॉ. सी. ग. देसाई यांचे 'सार्थ श्री गणेश सूक्त व कवच', तसेच 'संत साहित्यातील 'गणेश वंदना' हा कार्यकारी संपादक विद्याधर ताठे यांचा लेख उद्बोधक आहेत. 'साई-वंदना'तील सर्वच कविता संग्रही ठेवण्यासारख्या आहेत.

संसारी माणसास यज्ञ, याग, व्रत-वैकल्ये, नवससायास, जप-तप न करता नित्याचा उद्योग नेकीने व सचोटीने करीत रामप्रभूंच्या चिंतनात रंगायला लावणाऱ्या गोंदवलेकर महाराजांवरील 'पवित्र ते कुळ, पावन तो देश' हा श्री. प्र. न. जोशी यांचा लेख मननीय आहे.

'स्वामी स्वरूपानंदांचे अमृतबोल' या श्री. भालचंद्र गन्द्रे यांच्या लेखातील स्वामींनी आपल्या भक्तांना लिहिलेली पत्रे वाचल्यानंतर ती खरोखरच कलियुगात गुरुपादिष्ट मार्गासाठी धडपडणाऱ्या मुमुक्षूंना विचार-प्रवर्तक, उद्बोधक व अमृतानुभव देणारी आहेत, याचा प्रत्यय येतो.

'जाको राखे साईयाँ' या डॉ. सौ. सुनंदा खेरडे यांच्या लेखातील 'कुमुदिनी काय जाणे तो परिमळ। भ्रमर सकळ भोगितसे ॥ तैसे तुज ठावे नाही तुझे नाम। आम्ही ते प्रेमसुख जाणो ॥ या संत तुकारामांच्या अभंगातून 'नाममहिमा' अत्यंत मार्मिक शब्दांत वर्णिलेला आहे. 'महात्मा बसवेश्वर - जीवन आणि कार्य' या श्री. सुनिल रुकारी यांच्या लेखातील महात्मा बसवेश्वरांचे 'श्रमातूनच शिवप्राप्ती' हे तत्त्व श्रमाला प्रतिष्ठा मिळवून देणारे आहे.

'सर्व रोगांवर एकच औषध - प्रसन्नता' हा पं. श्रीराम शर्मा आचार्य यांचा लेख मननीय आहे.

'देवघर' या डॉ. बाळाजी आठवले यांच्या लेखात मानसपूजेचा सोपा मार्ग विशद केला आहे.

'माझ्यासाठी देव ते मी देवासाठी' हा डॉ. उर्मिला तेली यांचा लेखही चिंतनीय आहे.

'साईसिंधूतील बिंदू' या लेखात साईसेविकेने 'भावभक्तीची शिरापुरी' या ओवीचा अर्थ अतिशय गोड पद्धतीने विशद केला आहे.

मुखपृष्ठावरील श्री साईंचे ॐकारस्वरूप व मलपृष्ठावरील श्री गणेशाचे रूप विलोभनीय आहे. एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे संपादक श्री. द. म. सुकथनकर आणि कार्यकारी संपादक श्री. विद्याधर ताठे यांच्या कारकीर्दीत 'साईलीला'चे अंक वेळेवर मिळू लागले आहेत. त्याबद्दल धन्यवाद !

'साईलीला'ची प्रगती अशीच उत्तरोत्तर वृद्धिंगत होत राहो, ही श्री साईचरणी विनम्र प्रार्थना !

**- श्री साईचरणरज**
**स्मिता कावले**
मालाड, मुंबई.

❑❑❑

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## प्रकाशित चित्रांची सूची

| अ. क्र. | चित्राचे नाव | आकार | मूल्य + टपाल खर्च |
|---|---|---|---|
| १. | दगडावर बसलेले बाबा (कृष्णधवल) | १४''x२०'' | ०२.४० + टपाल खर्च |
| २. | दगडावर बसलेले बाबा (रंगीत) | १४''x२०'' | ०३.०० + टपाल खर्च |
| ३. | दगडावर बसलेले बाबा (रंगीत) | पोस्टकार्ड | - + टपाल खर्च |
| ४. | दगडावर बसलेले बाबा (रंगीत) | ४''x३'' | ००.२५ + टपाल खर्च |
| ५. | द्वारकामाई (रंगीत) | १४''x२०'' | ०३.०० + टपाल खर्च |
| ६. | द्वारकामाई (रंगीत) | १०''x१४'' | ०२.०० + टपाल खर्च |
| ७. | द्वारकामाई (रंगीत) | ७''x१०'' | ०१.०० + टपाल खर्च |
| ८. | द्वारकामाईत बसलेले बाबा (कृष्णधवल) | १४''x२०'' | ०३.०० + टपाल खर्च |
| ९. | द्वारकामाईत बसलेले बाबा (रंगीत) | १०''x१४'' | ०२.०० + टपाल खर्च |
| १०. | द्वारकामाईत बसलेले बाबा (रंगीत) | ७''x१०'' | ०१.०० + टपाल खर्च |
| ११. | चेहरा फोटो (रंगीत) | पोस्टकार्ड | - + टपाल खर्च |
| १२. | पालखी फोटो (रंगीत) | ७''x१०'' | ०१.०० + टपाल खर्च |
| १३. | मूर्ती फोटो (रंगीत) | १४''x२०'' | ०३.०० + टपाल खर्च |
| १४. | मूर्ती फोटो (रंगीत) | १०''x१४'' | ०२.०० + टपाल खर्च |
| १५. | मूर्ती फोटो (रंगीत) | ७''x१०'' | ०१.०० + टपाल खर्च |

सूचना : कृपया सुधारित मूल्य व टपालखर्चासाठी लिहावे.

पुस्तके व छायाचित्रे खालील ठिकाणी उपलब्ध आहेत :
(१) कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान, शिरडी - ४२३ १०९, ता. राहाता, जि. अहमदनगर, महाराष्ट्र राज्य. ई-मेल : saibaba_anr@sancharnet.in
• URL :http://www.shrisaibabasansthan.org
(२) 'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर (पूर्व), मुंबई - ४०० ०१४.
ई-मेल : saidadar@bom3.vsnl.net.in



श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे
नवीन प्रकाशन
वाचताना शिरडीत असल्याचा भास
निर्माण करणारी व
क्षणाक्षणाला उत्कंठा वाढविणारी
**श्री साईंच्या प्रत्यक्ष सान्निध्यातील**
दादासाहेब खापर्डे यांची



पृष्ठे : १५२

# शिरडी रोजनिशी

मूल्य : रु. १५ केवळ

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## प्रकाशित पुस्तकांची सूची

| अ. क्र. | पुस्तकाचे नाव | भाषा | मूल्य + टपाल खर्च |
|---|---|---|---|
| १. | श्री साई सच्चरित पोथी | मराठी | ७०.०० + टपाल खर्च |
| २. | श्री साई सच्चरित | इंग्रजी | २२.०० + टपाल खर्च |
| ३. | श्री साई सच्चरित | हिंदी | २४.०० + टपाल खर्च |
| ४. | श्री साई सच्चरित | गुजराथी | ३०.५० + टपाल खर्च |
| ५. | श्री साई सच्चरित | कन्नड | २४.५० + टपाल खर्च |
| ६. | श्री साई सच्चरित | तेलुगु | २५.०० + टपाल खर्च |
| ७. | श्री साई सच्चरित | तामीळ | ३०.५० + टपाल खर्च |
| ८. | श्री साई सच्चरित | सिंधी | ५०.०० + टपाल खर्च |
| ९. | श्री साई सच्चरित पोथी | गुजराथी | ७२.०० + टपाल खर्च |
| १०. | श्री साई सच्चरित पोथी | कन्नड | ८८.०० + टपाल खर्च |
| ११. | श्री साईलीलामृत | मराठी | १५.०० + टपाल खर्च |
| १२. | श्री साईलीलामृत | हिंदी | १५.५० + टपाल खर्च |
| १३. | श्री साईलीलामृत | गुजराथी | - |
| १४. | अवतार व कार्य | मराठी | ०७.५० + टपाल खर्च |
| १५. | स्तवन मंजिरी | मराठी | ०१.२५ + टपाल खर्च |
| १६. | स्तवन मंजिरी | हिंदी | ०२.०० + टपाल खर्च |
| १७. | स्तवन मंजिरी | गुजराथी | ०२.५० + टपाल खर्च |
| १८. | स्तवन मंजिरी | इंग्रजी | ०२.०० + टपाल खर्च |
| १९. | सगुणोपासना (आरती) | मराठी | - |
| २०. | सगुणोपासना (आरती) | हिंदी | ०२.०० + टपाल खर्च |
| २१. | सगुणोपासना (आरती) | गुजराथी | ०२.०० + टपाल खर्च |
| २२. | सगुणोपासना (आरती) | तेलुगु | ०४.६० + टपाल खर्च |
| २३. | सगुणोपासना (आरती) | सिंधी | ०१.२५ + टपाल खर्च |
| २४. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | ०३.०० + टपाल खर्च |
| २५. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | ०८.०० + टपाल खर्च |
| २६. | मुलांचे साईबाबा | मराठी | ०२.०० + टपाल खर्च |
| २७. | मुलांचे साईबाबा | इंग्रजी | ०३.५० + टपाल खर्च |
| २८. | मुलांचे साईबाबा | हिंदी | ०२.०० + टपाल खर्च |
| २९. | मुलांचे साईबाबा | गुजराथी | - |
| ३०. | मुलांचे साईबाबा | तेलुगु | - |
| ३१. | रुद्राध्याय (अ. ११वा) | मराठी | ०१.२५ + टपाल खर्च |
| ३२. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | १२.०० + टपाल खर्च |
| ३३. | साईबाबा ऑफ शिरडी (भरुचा) | इंग्रजी | - |
| ३४. | साईबाबा ऑफ शिरडी (प्रधान) | इंग्रजी | - |
| ३५. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | - |
| ३६. | खापर्डे डायरी | इंग्रजी | १२.२५ + टपाल खर्च |
| ३७. | दादासाहेब खापर्डे यांची शिरडी रोजनिशी | मराठी | १५.०० + टपाल खर्च |
| ३८. | विष्णुसहस्रनामावली | मराठी | ०२.५० + टपाल खर्च |

सूचना : कृपया सुधारित मूल्य व टपाल खर्चासाठी लिहावे.

# साईभक्तांना आवाहन



**प्रिय साईभक्तांनो !**

सप्रेम नमस्कार,

आपण '**साईलीला**'चे वाचक आणि वर्गणीदार आहात. '**साईलीला**'चे नवे स्वरूप आपणा सर्वांनाच आवडले आहे. तशी पत्रे आम्हाला येत आहेत. त्याबद्दल धन्यवाद !

श्री साईबाबांचे कार्य, त्यांची शिकवण, भक्तांना आलेले त्यांचे अनुभव आणि अध्यात्माचा प्रसार अधिकाधिक लोकांत करणे म्हणजेच साईसेवा आहे. त्यासाठी '**साईलीला**' सर्वाधिक लोकांपर्यंत पोहोचावयास हवी. या साईसेवेत आपणं वाढ करू शकता !

आपण फक्त पाच वर्गणीदार '**साईलीला**'स मिळवून द्यायचे. त्यामुळे आपल्या हातूनही साईसेवा घडेल आणि श्री साईबाबा आपल्यावर कृपा करतील याची आपणासही कल्पना आहेच.

तरी, खालील फॉर्मवर पाच वर्गणीदारांचे पत्ते व प्रत्येकी ५० रु. प्रमाणे एकूण २५० रु. पाठवावे.

कळावे. **श्री साईबाबांच्या आशीर्वादासह !**

आपला स्नेहांकित,

**विद्याधर ताठे**

कार्यकारी संपादक, 'साईलीला'

---------------✂---------------✂---------------✂---------------✂---------------✂---------------

कार्यकारी संपादक,

**'साईलीला'**,

८०४-बी, साईनिकेतन,

डॉ. आंबेडकर रोड, दादर (पू.),

मुंबई- ४०० ०१४.

यांस,

आपण साईभक्तांना आवाहन केल्याप्रमाणे सोबतच्या जोडलेल्या कागदावर पाच वर्गणीदारांचे पत्ते पाठवीत असून त्यांची प्रत्येकी वार्षिक वर्गणी ५० रु. प्रमाणे रु. २५० (एकूण दोनशेपन्नास मात्र) सोबत मनीऑर्डरने/चेकद्वारा/रोख पाठवीत आहे. त्याचा स्वीकार व्हावा.

श्री साईबाबांच्या शिकवणुकीचा प्रसार करण्याची संधी आपण यानिमित्ते मला देऊन साईसेवा करण्यास उद्युक्त केलेत याबद्दल आभारी आहे. कळावे.

आपला,

नाव : ______________________________

पत्ता : ______________________________

______________________________

(ता. क. : सोबतच्या कागदावर पाच नव्या वर्गणीदारांचे पत्ते जोडले आहेत.)




बगीचा, श्री साईबाबा संस्थान, शिरडी


आत्मनिवेदन
श्रवण
सख्य
कीर्तन
दास्य
स्मरण
वंदन
अर्चन
पादसेवन

# साईलीला



# गुरुपौर्णिमा उत्सव २००२





उत्सवाच्या पहिल्या दिवशी 'श्री साईसच्चरित' ग्रंथ, वीणा व श्री साईं
प्रतिमेची शोभायात्रा समाधी मंदिराकडून द्वारकामाईकडे जाता



भक्तीत दंग साईभक्त



द्वारकामाईत 'श्री साईसच्चरित' ग्रंथाच्या अखंड पारायणाचा 'श्री



श्री साईदरबारात भक्तिगीत सादर करताना राजा काळे (मुंबई)




श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे
अधिकृत नियतकालिक

# साईलीला

वर्ष ३ अंक ४

**सप्टेंबर–ऑक्टोबर**
**२००२**

इंटरनेट आवृत्ती
URL:http://www.shrisaibabasansthan.org



संपादक
**द. म. सुकथनकर**
कार्यकारी संपादक
**विद्याधर ताठे**

*** कार्यालय ***
'साईनिकेतन',
८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई - ४०० ०१४.
दूरध्वनी : ४१६६५५६, ४१६१२९३
फॅक्स : (०२२) ४१५ ०७९८
ई-मेल : saidadar@bom3.vsnl.net.in




संगणकीय अक्षरजुळणी
**संगणकीय विभाग, मुंबई**
**श्री साईबाबा संस्थान, शिरडी**
मुद्रण
**चिराग प्रिंटर्स, मुंबई**

वार्षिक वर्गणी : रु. ५०/-
आजीव सभासद वर्गणी : रु. १०००/-
परदेशाकरिता वार्षिक वर्गणी
रु. १०००/- (टपालखर्चासहित)
अंकाची किंमत : रु. ८/-

मुद्रक, प्रकाशक द. म. सुकथनकर, अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान, शिरडी यांनी हे नियतकालिक, 'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - १४ येथे छापून प्रसिद्ध केले.



या नियतकालिकातील लेखांत प्रसिद्ध झालेली मते ही त्या लेखांतील लेखकांची स्वतंत्र मते असून त्या मतांशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

*** दसरा – श्री साई पुण्यतिथी – दीपावली ***
**(मंगळवार, दिनांक १५.१०.२००२, आश्विन शुद्ध १०, शके १९२४)**

## अंतरंग


| | |
|---|---|
| * **संपादकीय** : विद्याधर ताठे | ३ |
| * **॥ श्री साईसच्चरितातील देवी-माहात्म्य ॥** : साईसेविका | ५ |
| * **साईबाबांचे गीता भाष्य-प्रवचन** : वसंत दळवी | १४ |
| * **॥ साई उवाच ॥** : संग्राहक - कै. प्र. का. सोमण | २८ |
| * **श्री क्षेत्र अंबेजोगाई** : प्रा. डॉ. चंद्रकांत धांडे | ३२ |
| * **॥ ऐसा महिमा पंढरीचा ॥** : विद्याधर ताठे | ३५ |
| * **श्री क्षेत्र प्रतिष्ठान : नाथांचे पैठण** : डॉ. कुमुद गोसावी | ३९ |
| * **समर्थ रामदासस्वामींचा सज्जनगड** : श्रीधर सेवक | ४५ |
| * **श्री स्वामी समर्थांची 'प्रज्ञापुरी'** : प्रा. डॉ. नरेंद्र कुंटे | ४७ |
| * **शेगावक्षेत्रीचे गजानन महाराज** : डॉ. सौ. सुनन्दा खेरडे | ५० |
| * **प्रज्ञाचक्षु गुलाबराव महाराज** : प्रा. अजित कुलकर्णी | ५७ |
| * **साईंच्या सान्निध्यात - म्हाळसापती** : सौ. मुग्धा दिवाडकर | ६३ |
| * **अमृत कलश** : संग्राहक - सुभाष जगताप | ६९ |
| * **सुखी जीवनासाठी अध्यात्म** : डॉ. सौ. अंजली देशपांडे | ७१ |
| * **अलौकिक अनुभूती** : जितेंद्र दळवी | ७२ |
| * **नमस्कार त्या सिद्धसाईपदांसी** : ह.भ.प. द. ग. जोशी | ७३ |
| * **साई वंदना** | ७४ |
| * **मरण ही देहाची सुखस्थिती ।** : साईसेविका | ७७ |
| * **अभिप्राय** | ८० |

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## विश्वस्त मंडळ


**श्री. द. म. सुकथनकर**

(अध्यक्ष)


| | | | |
|---|---|---|---|
| श्री. मोहन मो. जयकर | (सदस्य) | श्री. शांताराम रं. मिराणे | (सदस्य) |
| श्री. रमेश दा. सोनी | ,, | श्री. प्रदीप र. पटेल | ,, |
| श्री. प्रकाश प्र. वैशंपायन | ,, | श्री. प्रकाश द. वागस्कर | ,, |
| श्री. भास्कर शं. बोरावके | ,, | श्री. दास ह. इनामदार | ,, |
| श्री. राजीव पुं. रोहोम | ,, | डॉ. अरुण दि. रासने | ,, |
| श्री. शामसुंदर ल. शहाणे | ,, | श्री. रमेश म. केंगे | ,, |
| श्री. चांगदेव ना. डुबे पाटील | ,, | डॉ. विलास द. पोतनीस | ,, |
| डॉ. अजेय चं. गर्जे | ,, | डॉ. तुकारसम च. राठोड | ,, |
| श्री. कैलास गो. कोते पाटील | ,, | सौ. सुनीता वि. क्षीरसागर | ,, |
| श्री. देवराम बं. पवार | ,, | श्री. मधुकर सो. दंडवते | ,, |

**श्री. भाऊसाहेब रा. वाकचौरे** (कार्यकारी अधिकारी)





# संपादकीय



**शुभं करोति कल्याणम् आरोग्यं धनसंपदा ।**
**शत्रुबुद्धि विनाशाय दीप ज्योती नमोस्तुते ।।**

दसरा-दिवाळी म्हणजे दीपोत्सवाचे आनंद सोहळे ! सण आणि उत्सव हे आपल्या भारतीय जीवनाचे सांस्कृतिक दर्शन आहे. सण व उत्सवाच्या वेळी माणसांच्या मनात प्रसन्नतेचे मळे फुलतात. आपली घरे-दुकाने-कार्यालये आपण दिव्यांनी-फुलांनी सजवितो. सुंदर अशा रांगोळ्यांनी मनाची प्रसन्नता दारा-दारापुढे फुलून येते. नवे कपडे-दागिने-गोड पक्वान्नांचा स्वयंपाक आणि धार्मिक पूजाविधी हे व्यक्तिपरत्वे कमी-अधिक आणि वेगवेगळे असतात. दिवाळी ही केवळ श्रीमंतांची नव्हे, ती गरिबांचीसुद्धा आहे. श्रीमंतांएवढा थाटमाट गरिबांच्या झोपडीत नसेल, पण मनाची प्रसन्नता व आनंद इथे कांकणभर अधिकच दिसेल. खरं तर दिवाळी-दसरा हे केवळ वैभवी प्रदर्शनाचे वा उपभोगांच्या विलासाचेच सण नाहीत, तर या बाहेरच्या झगमगाटाबरोबरच मनातील अंतर्ज्योतीला इथे अधिक महत्त्व आहे. खरं तर तेच मुख्य आहे. कोकण परिसरातील एक प्रसिद्ध संत सोहिरोबा अंबिये म्हणतात - ''अंतरीचा ज्ञानदीप मालवू नको रे।'' हा अंतरीचा दीप फार महत्त्वाचा आहे. झोपडीत-घरात-बंगल्यात एक दिवा कमी लावा, पण अंतरीचा दीप प्रज्वलित ठेवण्यास विसरू नका. या अंतरीच्या दीपालाच **'सत्यासत्य विवेक', 'अंतरात्म्याचा आवाज'** म्हटले जाते. आज भ्रष्टाचाराने व स्वार्थांधाने सारे जग अंधारलेले आहे. आपणही या भ्रष्ट जगात आपला अंतर आवाज हरवून बसलेलो तर नाहीत ना ? असा प्रत्येकाने स्वतःला प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. भ्रष्टाचाराने ग्रासलेल्या या जगात मनाच्या प्रामाणिकतेला ग्वाही ठेवून जगणे आज निश्चितच अवघड झाले आहे; पण अशक्य नाही. पक्का निर्धार करा. थोडा स्वार्थ दूर ठेवा. सत्याच्या बाजूने ठामपणे उभे राहा. थोडे सोसा. साईंचे स्मरण करा आणि नवी प्रेरणा-स्फूर्ती घेऊन सीमोल्लंघन करा, नवा दीपोत्सव साजरा करा.

प्रस्तुतच्या दसरा-दिवाळी विशेषांकात आम्ही महाराष्ट्रातील काही निवडक क्षेत्रांची माहिती दिलेली आहे. खरं तर महाराष्ट्रातील तीर्थक्षेत्रांची संख्या पाहाता त्यांची माहिती अशा एखाद्या अंकात देता येणे शक्यच नाही. या मर्यादा लक्षात घेऊनच निवडक क्षेत्रांचा महिमाच इथे समाविष्ट केला आहे. ज्या क्षेत्रांची माहिती समाविष्ट नाही त्याविषयी वाचकांच्या गोड तक्रारी येणार, हेही आम्ही गृहीत धरलेले आहे. साईबाबा, शेगावचे गजानन महाराज व अक्कलकोटचे स्वामी समर्थ या तीन आधुनिक काळातील अवतारी संतांना 'त्रैमूर्ती' रूपात एकत्रित भजणारे अनेक भक्त आहेत, हे लक्षात घेऊन श्री क्षेत्र अक्कलकोट व शेगाव यांना आम्ही विशेष प्राधान्य दिलेले आहे. डॉ. सुनंदा खेरडे व डॉ. कुंटे यांचे या अंकातील लेख त्या दृष्टीने विशेष म्हणता येतील. शिरडी हे गोदावरीच्या काठावरील क्षेत्र आहे. गोदावरीच्या काठावर अशी अनेक तीर्थक्षेत्रे आहेत. नाथांचे पैठण त्यापैकी एक प्रमुख आहे. त्यामुळे पैठण महिम्यालाही आम्ही प्रमुखत्वाने स्थान दिलेले आहे. डॉ. कुमुद गोसावी या पैठणच्या संत एकनाथ मंदिर समितीच्या शासननियुक्त एक सदस्या आहेत. डॉ. कुंटे, डॉ. खेरडे, डॉ. कुमुद गोसावी या 'साईलीला'च्या लेखकपरिवारातील आहेत. यापुढे प्रत्येक अंकात एका

## संपादकीय

तीर्थक्षेत्राची माहिती देण्याचा आमचा मानस आहे. वाचकांनी आपल्या परिसरातील तीर्थक्षेत्राची माहिती आणि मुख्य म्हणजे छायाचित्रे 'साईलीला'कडे पाठवावीत. त्याचे सहर्ष स्वागत आहे.

साईलीला वाचकांना एक आनंदाची वार्ता सांगणे अत्यावश्यक आहे. कारण त्यामागे वाचकांचे - वर्गणीदारांचे श्रेय महत्त्वाचे आहे. **'दिवा'** (दिवाळी वार्षिकांक समिती) व ग्रहांकित मासिकाच्या संयुक्तमाने ५० वर्षांपेक्षा अधिक काळ प्रकाशित होणाऱ्या अंकांच्या संपादकांचा नुकताच पुण्यात गौरव करण्यात आला. त्या गौरव सोहळ्यामध्ये ८०व्या वर्षात पदार्पण करीत असलेल्या आपल्या 'साईलीला'चा व कार्यकारी संपादक म्हणून माझा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. १९०६ सालचे **'आनंद'**, १९१८ चे **'किर्लोस्कर'**, १९२२ चा **'मौज'** आणि १९२३ चे **'साईलीला'** असा मराठी-वाङ्मय-विश्वात **'साईलीला'**चा ज्येष्ठतेच्या यादीत चौथा क्रमांक आहे. मान्यवर सव्यसाची लेखकांनी सुरू केलेली आणि धनिकांचा वरदहस्त लाभलेली अशी दोन्ही प्रकारची अनेक मासिके अकाली बंद पडलेली पाहता 'साईलीला'ची ८० वर्षांची अव्याहत वाटचाल ही साईबाबांचीच अगाध लीला आहे, असे आम्हास वाटते.

'साईलीला' हा साईबाबांचा कृपाप्रसाद आहे. स्वतः बाबाच हे नियतकालिक चालवीत आहेत. स्वतःचे चरित्र हेमाडपंतांना निमित्त करून जसे बाबांनी लिहून घेतले, तद्वतच आम्ही संपादक हे केवळ निमित्तमात्रच आहोत. बाबा स्वतःच स्वतःच्या विश्वधर्माचा-मानवधर्माचा या 'साईलीला' नियतकालिकाच्या द्वारे प्रसार-प्रचार करीत आहेत. श्रीकृष्णांनी गीता सांगतानाही अर्जुनाला **"निमित्तमात्राणि भव सव्यसाचि। तू या कार्यास केवळ निमित्त आहे"**, असे स्पष्टपणे प्रतिपादलेले आहे. आम्ही खरेच भाग्यवान की 'साईलीला'साठी बाबांनी आम्हास निमित्त केले आहे. काही सेवा या जीवन कृतार्थ - धन्य करणाऱ्या असतात. 'साईलीला'ची सेवा ही अशीच एक धन्यतेची यात्रा आहे.


**त्याच शब्दांवर ठेवावे मन। तयांचेच नित्य करावे चिंतन।**
**तेच तुमच्या उद्धारा कारण। ठेवा हे स्मरण निरंतर॥** (११५/४५)

या हेमाडपंतांच्या ओव्यांनीच या संपादकीयास पूर्णविराम देणे समर्पक आहे, असे मला वाटते.

बाबांच्या पुण्यतिथीची यंदाची इंग्रजी तारीख व भारतीय तिथी मिती ही एकच जुळून आलेली आहे. अशा या योगायोग आलेल्या दसऱ्याच्या सीमोल्लंघनास सर्व भक्तांना संस्थानच्या व संपादक मंडळाच्या सानंद शुभेच्छा !

दीपावली शुभचिंतन !

**(विद्याधर ताठे)**
कार्यकारी संपादक, साईलीला



# ।। श्री साईसच्चरितातील देवी-माहात्म्य ।।

- साईसेविका

आपल्या सर्व प्रमुख धर्मग्रंथांत ईशतत्त्व एकच आहे, असे सांगितले आहे; मग ते देव असोत अथवा देवता. काही वेळा तर देवांच्या शक्तीपेक्षा देवतांच्या शक्तीचा उपयोग दानवांचा संहार करण्यासाठी अधिक झालेला आढळतो. उदाहरणार्थ, 'एकादशी माहात्म्य'. ब्रह्मा-विष्णू-महेश व सावित्री-लक्ष्मी-पार्वती यांच्या श्वासोच्छवासाने निर्माण झालेल्या 'एकादशी' या देवतेने अनेक दानवांचा नाश

**जया मनी जैसा भाव । तया तैसा अनुभव । हे साईबाबांच्या अवताराचे वैशिष्ट्य आहे. बाबांनी भक्तांना त्यांच्या इष्ट देवी-देवतांच्या रूपांत दर्शन दिलेले आहे. प्रस्तुत लेखात नवरात्रीनिमित्त साईसेविकेने बाबांच्या देवीरूपाचे आपणास दर्शन घडविले आहे.**

केला, असा उल्लेख असल्याने 'एकादशी व्रत' केले जाते; तर नवरात्र-महिमा, देवी माहात्म्य यांत पार्वतीने नऊ अवतार घेऊन अनेक दानवी वृत्तींचा व दानवांचा सर्वनाश केला आणि विजय मिळविला, ही कथा असून त्यानिमित्त आपण विजयादशमी - दसरा हा उत्सव मोठ्या आनंदाने साजरा करीत असतो.

श्री साईसच्चरितातील अध्याय लक्षपूर्वक वाचले, अभ्यासले, तर असे आढळते की, समर्थ साईबाबांनी देवींची प्रसंगानुरूप रूपे धारण करून आपल्या भक्तांना मार्गदर्शन केलेले आहे; तसेच भक्तांचे संरक्षण व त्यांच्यातील 'अहं-रावणाचा', विनाशकारी प्रवृत्तींचा नाश केलेला आहे. ही रूपे साईबाबांनी कशाप्रकारे व कोणत्या कारणांसाठी घेतली ते आता पाहू या!

श्री साईसच्चरिताचे लेखक कै. गो. र. दाभोलकर ऊर्फ हेमाडपंत यांच्यावर पूर्णपणे कृपा करून, त्यांना वेळोवेळी अनुभूती देऊन, त्यांच्यातील सुप्त गुणांचा उपयोग करून प्रासादिक ग्रंथ 'श्री साईसच्चरित' लिहून घेतला. या ठिकाणी हेमाडपंतांना **समर्थ साईबाबा हे देवी सरस्वतीच्या रूपात** भासले; आणि त्या सरस्वतीदेवीनेच आपल्याकडून साईगाथा लिहून घेतली, असा ते नम्रपणे अध्याय १मध्ये उल्लेख करतात. सुरुवातीला हेमाडपंतांनी देवी सरस्वतीला अतिशय लीन होऊन नमन केले आहे व प्रार्थना केली आहे की,

## सात्त्विक गुणांची अधिष्ठात्री देवता - श्री महासरस्वती

**आतां नमूं ब्रह्मकुमारी ।**
**सरस्वती जे चातुर्य लहरी ।**
**या मम जिव्हेसी हंस करीं ।**
**होईं तिजवरी आरूढ ।।१३।।**
**ब्रह्मवीणा जिचे करीं ।**
**निढळीं आरक्त कुंकुमचिरी ।**
**हंसवाहिनी शुभ्रवस्त्री ।**
**कृपा करीं मजवरी ।।१४।।**
**ही वाग्देवता जगन्माता ।**
**नसतां इयेची प्रसन्नता ।**
**चढेल काय सारस्वत हाता ।**
**लिहवेल गाथा काय मज ।।१५।।**
**जगज्जननी ही वेदमाता ।**
**विद्याविभव ही गुणसरिता ।**
**साईसमर्थचरितामृता ।**
**पाजो समस्तां मजकरवीं ।।१६।।**

अशाप्रकारे प्रार्थना केल्यावर हेमाडपंतांना समर्थ साईबाबा भगवती सरस्वतीच्या रूपात दिसू लागले. साईबाबा आपल्याकडून कठीण असे अपौरुषेय लेखनकार्य - 'श्री साईसच्चरित' रूपाने करून घेत आहेत, असा निश्चित दृढ श्रद्धाभाव हेमाडपंतांच्या अंत:करणात स्फुरण पावला. कारण, पुढे ते म्हणतात :-

**साईच भगवती सरस्वती।**
**ॐकारवीणा घेऊनि हातीं।**
**निजचरित्र स्वयेंचि गाती।**
**उद्धारस्थिती भक्तांच्या ।।१७।।**

याचाच अर्थ असा होतो की, समर्थ साईबाबांनी स्वत:चे चरित्र भक्तांच्या उद्धारासाठी लिहवून घेण्यासाठी सरस्वतीदेवी, जी सर्व विद्यांची, ज्ञानाची अधिष्ठात्री आहे, नादब्रह्म निर्माण करून शब्दरचना गुंफणारी वीणाधारी आहे, तिचे रूप धारण करून भविष्यातील आपल्या भक्तांच्या कल्याणाची, उद्धाराची तरतूद करून ठेवली आहे.

## तमोगुणांची अधिष्ठात्री देवता - श्री महाकाली

रूद्ररूप धारण करून राक्षसांचा नि:पात करणारी, तसेच राक्षसी वृत्तींचा ऱ्हास करणारी म्हणून श्री महाकाली देवतेची प्रसिद्धी आहे. समर्थ श्री साईबाबांनी महाकाली देवतेचे रूप घेऊन माणसांतील 'अहं-रावणाचा' सर्वनाश केला, वाईट प्रवृत्तींचा त्याग करावयास भाग पाडले, असा उल्लेख अध्याय ६ व अध्याय ४२मध्ये आढळतो.

सन १९११मध्ये मशिदीचा जीर्णोध्दार करण्याचे ठरले. नवीन फरसबंदी, आधाराचे खांब घालून मशीद परत बांधून घ्यावी, असा विचार होताच काम सुरू झाले; तर रातोरात स्वहस्ते समर्थ साईबाबांनी ते खांब उपटून काढावेत व मोडून टाकावेत, असे सुरू झाले. त्यानंतर साईबाबांनी एका हातात तात्याबा कोते पाटील यांची मान धरली, त्यांच्या डोक्याचा फेटा काढून तो काडी लावून पेटवून दिला, शिव्याशापांचा वर्षाव मुखाने सुरू केला. तात्याबाला



सोडवायला आलेले भागोजी शिंदे व माधवराव देशपांडे यांना विटांच्या माऱ्याने बडवून काढले. त्यावेळी साईबाबांचे रूप कसे होते, तर :-

**तया समर्थीचे ते डोळे।**
**दिसत जैसे अनल गोळे।**
**सन्मुख पाहील कोण त्या वेळे।**
**धैर्य गेलें सकळांचें ।।१३६।।**

त्याच सुमारास रामनवमी उत्सवाला सुरुवात झाली. रामजन्म होण्यापूर्वी साईबाबांनी पुन्हा एकदा रूद्रावतार धारण केला. कशासाठी, तर :-

**रामजन्माचिया अवसरीं।**
**गुलाल बाबांच्या नेत्रांभीतरी।**
**जाऊनि प्रकटले बाबा नरहरी।**
**कौसल्येमंदिरीं श्रीराम।।८४।।**
**गुलालाचें केवळ मिष।**
**रामजन्माचा तो आवेश।**

होईल अहं-रावणाचा नाश ।
दुर्वृत्ति - राक्षस मरतील ॥८५॥

१९१६ साली दसरा - शिलंगणाच्या वेळी समर्थ साईबाबांनी पुन्हा एकदा रूद्रावतार धारण केला; जणू जमदग्नीच. स्वत:च्या अंगावरील सर्व कपडे काढून पेटत्या धुनीत टाकले.

दिगंबर बनले ते जामदग्न्य ।
धन्य नयन देखत्यांचे ॥२६॥
त्वेषें टवकारिले नयन ।
क्रोधें झाले आरक्त नयन ॥२७॥
परी बाबा नाहीं स्थिरावले ।
लोक जागजागीं तटस्थ ठेले ।
टकमक उगले पाहती ॥३३॥

या प्रसंगीचा समर्थ साईबाबांचा रूद्रावतार भक्तांच्या मनातील संशय, कल्पना, विकल्प, दुर्वृत्ती नष्ट करण्यासाठी होता. श्री महाकाली देवता याहून भिन्न नव्हे. तिचेच रूप धारण करून साईबाबांनी कार्य केले.

## रजोगुणांची अधिष्ठात्री देवता - श्री महालक्ष्मी

मार्गशीर्ष महिन्यात बहुतेक स्त्रिया आपली आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी लक्ष्मीव्रत करतात. संसार म्हटला की, पैशाची विवंचना आलीच. प्रपंच चालवताना अर्थलाभ व्हावा, त्याची कमतरता पडू नये म्हणून स्त्रिया महालक्ष्मीला मनोमन प्रार्थना करतात. समर्थ साईबाबा किती मोठ्या प्रमाणात द्रव्यदान करीत असत, याचा उल्लेख श्री साईसच्चरितात अध्याय ७ व अध्याय २९मध्ये आलेला आहे.

समर्थ साईबाबा अनेक भक्तांकडे दक्षिणा मागत असत. मात्र, त्या दक्षिणेचा उपयोग ते स्वत:साठी न करता सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत दान करून सांजसमयाला निर्धन होत असत. संग्रहसाठा मला फकिराला कशासाठी, असे ते म्हणत. त्यांचे रोजचे अर्थदान कशाप्रकारे होई, तर :-

कोणासी रोज रूपये तीस ।
कोणासी दहा, पंधरा, पन्नास ।
ऐसें मन मानेल तयांस ।
वांटीत उल्हास वृत्तीनें ॥३९॥



१९१६ साली एक भजनी मेळा चेन्नईहून शिरडीला आला. साईबाबा कृपावंत होऊन यात्रेकरूंस पैसे वाटतात, असा त्यांचा नावलौकिक झालेला होता. सढळ हाताने ते दानधर्म करीत असत. पांथस्थांना, यात्रिकांना त्यांची पैशाची मदत होत असे.

दिडक्या चवल्या हाताचा कीस ।
अधेल्या-पावल्यांचा पाऊस
रूपये दहा कोणास वीस ।
कोणास पन्नास ते देत ॥५॥
हें काय सणासुदा दिसीं ।
कार्यविशेषीं कां पर्वकाळासी ।
प्रतिदिवशीं उक्त प्रमाणेंसीं ।
संतोषेंसीं अर्पीत ॥६॥

साईबाबांकडे एक छोटीशी गोड मुलगी अमनी येई व लाडेलाडे हट्ट करी, ''बाबा, रुपय्या दे !'' साईबाबा तिला रोज एक व लेंडीवर जाताना एक असे रोजचे चांदीचे दोन रुपये देत.

ऐसे प्रति दिनीं दोन तिजला ।
सहा देत त्या जमलीला ।
पांच दादा केळकरांला ।
भाग्या सुंदरीला दोन दोन ॥२९॥
दहा ते पंधरा तात्याबासी ।
पंधरा ते पन्नास फकीरबाबांसी ।
आठ वांटिती गोरगरीबांसी ।
नित्यनेमेंसीं हें देणें ॥३०॥

अशी ही समर्थ साईबाबांची दानशीलता होती.

रघुनाथराव तेंडुलकरांची प्रामाणिक चाकरी व सेवाभावी भक्ती लक्षात घेऊन त्यांच्या निवृत्तीनंतर त्यांना शंभरऐवजी एकशेदहा रुपये निवृत्तीवेतन देण्याची बुद्धी साईबाबांनी वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याला दिली. तर, हेमाडपंतांना आपला सारा खजिनाच लुटवला. त्यांचे निवृत्त जीवन समृद्ध केले. स्वतःचे अवतारकार्य संपण्यापूर्वी लक्ष्मीबाई शिंदे यांना चांदीच्या नऊ रुपयांचे दान दिले.

**किंवा नवरात्र अंबिका पूजन ।**
**झाले आज की शिलंगण ।**
**सीमोल्लंघन-दक्षिणा ही ॥१२०॥**

तात्पर्य काय, तर समर्थ साईबाबा श्री महालक्ष्मीच्या रूपाने द्रव्यदान, दानधर्म करीत; दानाचे महत्त्व विशद करीत अर्थाचा अनर्थ करू नका म्हणून उपदेशही देत. असे हे श्री महालक्ष्मीचे रूप समर्थ श्री साईबाबांमध्ये दिसते.



श्री साईसच्चरिताचा अध्याय ३८ म्हणजे श्री अन्नपूर्णा देवीचे प्रसन्न हस्ते केलेले अन्नदान मनाला थक्क करून सोडते. समर्थ साईबाबांची पाकशास्त्रातील निपुणता, भक्तांची आत्मतृप्ती यांचे मनोहर दर्शन घडविणारा सदर अध्याय आहे. **समर्थ साईबाबा हे श्री अन्नपूर्णा देवीचे** रूप धारण करून कशाप्रकारे पाकनिर्मिती करीत, याचा प्रत्यय ३८व्या अध्यायात येतो.

**सदा सर्वदा दानधर्म । क्षुधाशांती परम वर्म ।**
**अन्नदान नित्यनेम । कर्मांत कर्म हें आद्य ॥१३॥**
**आचारधर्मामाजीं प्रधान । अग्रगण्य अन्नदान... ॥१५॥**
**म्हणूनि बाबाही अन्न संतर्पिती ।**
**लौकिक रीती आचरिती ॥१९॥**

समर्थ साईबाबा मशिदीच्या अंगणात एक मोठी चूल रचीत. त्यावर एक भलेमोठे पातेले ठेवून त्यात प्रमाणशीर पाणी उकळीसाठी ठेवीत. कधी मिठ्ठे चावल, तर कधी मांसमिश्रित पुलाव; कधी कणकेची मुटकुळी, तर कधी रोडगे; कधी थापलेले पानगे उकळत्या शिजलेल्या वरणात सोडून चवदार बनवत. पाट्यावर स्वहस्ते मसाला वाटत, मुगवड्या करीत. नंतर शिजलेल्या अन्नाची पूजा, वैश्यदेव करून सर्वांना पोटभर जेऊ घालत. वाण्याकडे जाऊन रोकड पैसे देऊन लक्षपूर्वक धान्य निवडून आणत. पूर्ण विचारांती मीठ, मिरची, जिरे-मिरे, भाजीपाला, नारळ, खोबरे सारे विकत आणत. दळण-पाखडणसुध्दा करत. गहू, डाळ, जोंधळे यांचे पीठ स्वतः जात्यावर दळून करीत. चुलीसाठी लाकूडफाटा विकत घेत. जोंधळ्याच्या पीठात ताक घालून आंबील शिजवत. शिजलेल्या अन्नाची पूजा झाल्यावर प्रसादाच्या दोन ताटांतील एक म्हाळसापतींना व दुसरे तात्याबाला पाठवीत. मग गरीब, दीनदुबळे यांना अन्नदान करीत. अशाप्रकारे साईबाबांच्या हातच्या प्रेमपूर्वक तृप्तिभोजनाचा स्वर्गीय आनंद भक्तमंडळी चाखत. सर्व हिशोब चोखपणे, सावधपणे करत. शंभर पानांचा अन्नसाठा त्यांच्याजवळ सदैव तयार असे. प्रत्येकाने या प्रसादाचा लाभ घ्यावा, असे त्यांना वाटे. पण, कुणालाही ते जबरदस्ती करीत नसत. ज्या भक्तांची प्रसादसेवनाची इच्छा असे त्यांना ते प्रेमाने पोटभर वाढीत असत. सन १९१०पर्यंत असे अन्नदान समर्थ साईबाबा दररोज करीत. पुढे पुढे साईबाबांना नैवेद्याची ताटे घराघरांतून येऊ लागली. काय नव्हते त्या ताटांत ! :-

**वरण भात शिरा पुरी ।**
**चपात्या चटणी कोशिंबिरी ।**

नानाविध पंचामृत खिरी।
अन्नसामग्री लोटली ।।१११।।
वडे अपूप सांजोऱ्या पुरिया।
कधीं शिखरिणी घारगे फेणिया।
विविध शाका खिरी कोशिंबिरीया।
बाबा मग बरविया एकवटती ।।१५७।।
कधीं मांडे पूर्णपोळिया।
कधीं पुरिया शर्करे घोळलिया।
कधीं बासुंदी शिरा सांजोरिया।
वाढिती गुळवरिया स्वादिष्ट ।।१६२।।
कधीं शुभ्र आंबेमोहोर।
तयावरी वरान्न सुंदर।
घृत लोणकढें स्वादिष्ट रुचिर।
शाखापरिकर वेष्टित ।।१६३।।
लोणचें पापड आणि रायतें।
नानापरींचीं भजीं भरितें।
क्वचिदाम्लदधितक्रपंचामृतें।
धन्य ते सेविते दिव्यान्ना ।।१६४।।

असे हे दिव्यान्न प्रत्येक घासानिशी भक्तांना तुष्टी-पुष्टी व क्षुधाशांती देत असे. देणारा व खाणारा दोघेही धन्य होत असत. वरील वर्णनातच **साईबाबा अन्नपूर्णादेवीचे परिपूर्ण स्वरूप** असल्याचे दिसून येते.

## सप्तश्रृंगी देवी

प्रत्येकाची कुलदेवता, कुलस्वामिनी ही त्या त्या कुलांचे रक्षण करणारी देवता असते. याचे महत्त्व सांगणारा श्री साईसच्चरितातील अध्याय आहे -३०.

वणीची सप्तश्रृंगी देवी व समर्थ साईबाबा म्हणजे ईशतत्त्व एकच आहे, हे सांगणारा कथाभाग या अध्यायात आलेला आहे. यावरून हेच सिद्ध होते की, साईबाबा सप्तश्रृंगी देवताच आहेत. साईबाबांचा आवडता, सदा समीप असणारा भक्त माधवराव देशपांडे ऊर्फ शामा याच्या आईने त्यांची कुलदेवता सप्तश्रृंगी हिला नवस केला. तिच्या मृत्यूसमयी तिला त्या केलेल्या नवसाचे स्मरण झाले. तिने तो नवस शाम्याला फेडावयास सांगितले व प्राण सोडला. आईला दिलेल्या वचनाप्रमाणे शाम्याने सोनाराकडून चांदीची दोन स्तनाग्रे करवून घेतली व साईचरणी अर्पण केली; कारण साईबाबांनाच तो सर्व देवता मानत होता. त्याचा एकच देव साईबाबा होते. परंतु, साईबाबांनी कुलदेवतेचा मान प्रथम आणि तो राखलाच पाहिजे म्हणून वणीला जाऊन तेथे अर्पण करण्यास सांगितले.



त्याच सुमारास सप्तश्रृंगी देवीचे पुजारी व उपासक काकाजी वैद्य यांची मन:शांती ढळली. सप्तश्रृंगी देवीने त्यांना स्वप्नदृष्टांत देऊन बाबांच्या दर्शनाला शिरडीला जा, म्हणून बजावले. त्याप्रमाणे ते शिरडीला जायचे कसे, या विवंचनेत होते. अशा वेळी माधवराव नेमके वणीला आले. साईबाबांच्या कृपेने व सप्तश्रृंगी देवीच्या इच्छेने शाम्याची गाठभेट काकाजींशी पडली. दोघांनाही अत्यानंद झाला. दोघांनाही एकमेकांची गरज होती. अशाप्रकारे दोघांची मनोरथे पूर्ण झाली.

या ठिकाणी आपल्याला कळून येते की, समर्थ साईबाबा व सप्तश्रृंगी देवी ही दोन्ही तत्त्वे एकरूप ईशतत्त्व आहेत.

श्री साईसच्चरिताचा अध्याय ४० म्हणजे समर्थ श्री



साईबाबा व हुताशनी देवता या एकच आहेत, याचे महत्त्व विशद करणारा अध्याय आहे. हेमाडपंतांना होळीपौर्णिमेच्या पहाटे स्वप्नदृष्टांत देऊन समर्थ साईबाबांनी सांगितले की, ''आज मी तुझ्याकडे होलीका-पूजनासाठी जेवावयास येतो.'' हेमाडपंत अत्यानंदातच जागे झाले. त्यांनी पत्नीला एक टिपरी मापाचे जास्त अन्नपदार्थ शिजवावयास सांगितले. पूरणा-वरणाचा स्वयंपाक तयार झाला. जेवणाची पंगत मांडली. पंक्तीत मधोमध साईबाबांसाठी म्हणून मानाचे चांदीचे ताट-पाट-रांगोळी-उदबत्ती असे सजविले. हेमाडपंतांची घालमेल सुरू झाली. साईबाबांनी मला येऊन सांगितले; मग आले कसे नाहीत ? इकडे ब्राह्मणांनी मंत्र म्हणण्यास सुरुवात केली. मुखात घास घालणार, तोच जिन्यावर अनोळखी पाऊले वाजली. दोन अनोळखी व्यक्तींनी एक पुडके हेमाडपंतांच्या हाती दिले व त्या व्यक्ती आल्या पावली निघून गेल्या. पुडके उघडून हेमाडपंत पहातात, तर.... साईबाबांची सुंदर छबी.

हेमाडपंतांना अत्यानंद झाला. त्यांनी ती छबी साईबाबांसाठी मांडलेल्या पानावर ठेवली. साईबाबांची आरती करून त्यांच्या नावाचा जयघोष केला. सर्वांनी होलीका देवीचा प्रसाद ग्रहण करण्यास सुरुवात केली.



अशाप्रकारे हुताशनी देवता मीच आहे, याची प्रचीती समर्थ साईबाबांनी आपल्या छबीद्वारे दिली.

रानात चांदभाई पाटलाबरोबर चिलीम पिताना अग्नीची गरज भासली, तेव्हा सटका जमिनीवर आपटून जमिनीतून अग्नी निर्माण केला व चिलीम शिलगावून दोघेजण चिलीम ओढू लागले. (अध्याय ५)



हुताशनी, अर्थातच अग्निदेवता. अग्नीवर आपली सत्ता कशी चालते, याचा प्रत्यय साईबाबांनी दिला. सन १९१०च्या धनत्रयोदशी दिवशी साईबाबा धुनीत लाकडे जाळीत बसले होते. धुनी प्रखर पेटली होती. निश्चित मनाने साईबाबा आपला उजवा हात धुनीत घालून बसले होते. का, तर....



....आपल्या लांबवर असलेल्या एका लोहार भक्ताच्या भट्टीत पडणाऱ्या मुलीचा प्राण वाचविण्यासाठी. एवढ्या लांब राहूनही त्यांनी तिला आगीत पडता-पडता अलगद उचलले. (अध्याय ७)

एकदा अचानक धुनीने पेट घेतला. ज्वाळा तक्तपोशीला भिडल्या. त्यावेळी साईबाबांच्या सटक्याच्या माऱ्याने व ''सबूर ! सबूर !'' अशा शब्दप्रहारांनी ज्वाळा हळूहळू नरम पडून पूर्णपणे थांबल्या.



एकदा साईबाबांची हंडी चुलीवर खदखदत होती. त्यात शिजणारे पदार्थ डावलाने हलवायचे होते. जवळ डाऊल, पळी काही मिळेना. हंडीखाली लाकडे जळत होती. हंडीत पदार्थ तळाला लागून जळू नयेत म्हणून साईबाबांनी डाव्या हाताने हंडी धरली व उजव्या हाताने ते उकळते पदार्थ वर-खाली हलवून संमिश्र केले. त्यांचा हात जसाच्या तसा राहिला.

अशाप्रकारे अग्नीवर समर्थ साईबाबांची सत्ता होती. म्हणजेच अग्नीचे दिव्य तेज व्यापलेले समर्थ साईबाबा हे अग्निदेवता - हुताशनी देवीही आहेत.



शिरडीतील सर्व ग्रामदेवतांची पूजा-अर्चा व जीर्णोद्धार समर्थ साईबाबांनी करवून घेतला. सर्व शिरडीवासी समर्थ साईबाबांनाच आपला देव मानत. सर्व ग्रामदेवता, कुलदेवतांचा मान साईबाबांना देत. परंतु, साईबाबांनी प्रत्येक ग्रामदेवतेचे पूजन भक्तांना करावयास लावून नंतरच स्वतःचे पूजन करून घेतलेले आहे. गावकऱ्यांचा साईबाबांप्रति किती श्रेष्ठ भाव होता, तर :-

**शिरडींत प्रत्यक्ष देव तो हाचि ।**
**भाविती हेंचि जन सारे ।।३५ ।।**
**देवा-देउळांचेही जीर्णोध्दार ।**
**बाबांनीं अपार करविले ।।३६ ।।**
**शिरडीस तात्या पाटिला हातीं ।**
**शनी-गणपती-शंकरपार्वती ।**
**ग्रामदेवी आणि मारुती ।**
**यांचीही सुस्थिति लाविली ।।३७।।** - अध्याय ७
**जोगाई जाखाई मरीआई । शनि शंकर अंबाबाई ।**
**मारुति खंडोबा म्हाळसाई ।**
**ठायीं ठायीं शिरडींत ।।१२२ ।।**
**परी अवघड प्रसंग येतां ।**
**कामीं पडेना एकही ग्रामस्था ।**
**तयांचा तो चालता बोलता धांवता ।**
**संकटीं पावता एक साई ।।१२३ ।।** - अध्याय ११

साईबाबांना ग्रामदेवतेचा मान गावकरी देत होते; परंतु साईबाबांनी ग्रामदेवतेची प्रथम पूजा-अर्चा करावयास सांगून त्या देवतांना मानाने पूजावे अशी पद्धत भक्तांना लावली.

**ग्रामदेवांविषयीं आदरता ।**
**दिसेल व्यापकता साईंची ।।१५५ ।।** - अध्याय २८

मेघा रोज सर्व ग्रामदेव-देवतांची पूजा करून मग साईबाबांची पूजा करावयास मशिदीत येई. एकदा खंडोबा-बाणाईची पूजा न करताच तो परतला व साईबाबांची पूजा करू लागला. त्यावेळी साईबाबांनी त्याला स्मरण दिले, "आज तू खंडोबा-बाणाईची पूजा न करता येथे आलास ?" ते दार बंद असल्याने मेघाचाही नाइलाज झाला. परंतु, साईबाबांनी त्याला परत पाठविले व सांगितले, "आता ते दार उघडे असेल. प्रथम तू रोजच्या प्रमाणे त्या ग्रामदेवतेचे पूजन करून मग माझी पूजा कर !" मेघा परत गेला, तर ग्रामदेवतेच्या मंदिराचे दार उघडे होते. (अध्याय २८)

शिरडीचे ग्रामजोशी लक्ष्मणमामा (माधवराव देशपांडे यांचे मामा) हे नियमितपणे प्रथम साईबाबांची षोडशोपचाराने पूजा करीत व नंतर ग्रामदेवतांना पूजत. साईबाबा देहधारी असताना त्यांचा हा नियमच होता. साईबाबांच्या समाधीनंतरही लक्ष्मणमामांच्या त्या पूजाक्रमात खंड पडला नाही.

**ऐशा सर्व ग्रामदेवतां ।**
**जोशीबुवा नित्य पूजितां ।।१७० ।।** - अध्याय ४३

तात्पर्य काय, तर वरील उदाहरणांवरून समर्थ साईबाबांची ग्रामदेवतेशी एकरूपता दिसून येते.

समर्थ साईबाबा व सागरदेवता - जलदेवता या एकस्वरूप असून त्यांच्यातील ईशतत्त्व एकच आहे, हे सांगणारा अध्याय आहे - ४५.

आनंदराव पाखाडे यांचे स्वप्न. स्वप्नातील साईआज्ञा व त्याची प्रत्यक्ष आलेली अनुभूती, हे वाचल्यावर वरील कथनाला अधिकच पुष्टी मिळते. एकदा रत्नजडित सोन्याच्या सिंहासनावर विराजमान झालेले साईबाबा सागरातून तरंगत येत होते. त्यांचे गुढघ्यापर्यंतचे पाय पाण्यातच होते. बाजूला आनंदराव व माधवराव देशपांडे कंबरभर पाण्यात उभे होते. माधवराव आनंदरावांना म्हणाले, "अहो, साईबाबांच्या पाया पडा !" आनंदराव त्यावर म्हणाले , "अहो, मघापासून मी तेच करावयास पहातो आहे; पण ते पाण्यातील पाय कसे धरू ?" त्यावर माधवराव साईबाबांना म्हणाले, "देवा, तुझे पाण्यात सोडलेले पाय वर काढ जरा !" शाम्याचे सारे हट्ट साईबाबा नेहमीच पुरवत. कारण, त्याची साईभक्ती व साईश्रद्धा

अतिशय प्रेमळ, एकनिष्ठ होती. साईबाबांनी आपले पाय पाण्याबाहेर काढले. लगेच आनंदरावांनी साईबाबांचे चरणद्वय मोठ्या भक्तिभावाने घट्ट धरून त्यांच्या चरणी माथा टेविला. साईबाबांनी त्यांना आशीर्वाद दिला :-

**''होईल जा रे तुझे कल्याण ।**
**काहीं न कारण भीतीचें '' ॥८८॥**


आणि पुढे म्हणाले :-

**''रेशीमकाठी धोतर एक ।**
**शाम्यास माझ्या देऊन टाक ।**
**तुज सुखदायक होईल'' ॥८९॥** - अध्याय ४५

माधवरावांना देण्यासाठी आनंदरावांनी धोतर आणले होते. परंतु, माधवराव म्हणाले, ''तुमच्याप्रमाणे मलाही साईआज्ञा झाली तरच मी धोतराचा स्वीकार करीन.'' आता तर साईबाबा देहधारी नव्हते. म्हणून, साईबाबांच्या छबीतील चरणांपाशी दोन चिठ्या दुमडून टाकल्या. एकीत लिहिले - ''धोतराचा स्वीकार करावा'', तर दुसरीत लिहिले होते - ''धोतराचा अव्हेर करावा.'' साईबाबांना वंदन करून त्यातील एक जी चिठ्ठी उचलली ती होती - ''धोतराचा स्वीकार करावा.'' या ठिकाणी भक्तिभाव, प्रेम, श्रध्दा यांचा उच्चतम नमुना पहावयास मिळतो.

अशाप्रकारे साईबाबांनी सागरदेवता हीपण माझेच रूप आहे, हे ठसविले. त्याचबरोबर जलदेवतेवर साईबाबांची सत्ता कशी चाले, याचे दर्शन इतर अध्यायांतूनही होते.

एकदा दासगणू महाराजांना पर्वकाळात चंद्रभागेत स्नान करण्याची इच्छा झाली. लगेच ते साईआज्ञा घ्यावयास गेले असता आपल्या बैठकीच्या दगडावर कमरेवर हात ठेवून



साईबाबा विठ्ठलस्वरूपात उभे राहिले. त्यांच्या समचरणांतील अंगुष्ठद्वयांतून करंगळीएवढी पाण्याची धार सुरू झाली. ते 'मधुर थंडगार अमृतजल' प्राशन करताच दासगणूंना ''शिरडी माझे पंढरपूर'' हे प्रासादिक भजन स्फुरले. (अध्याय ४)

चिलीम पेटवण्यासाठी प्रथम थापी, ओले फडके लागते. चांदभाई पाटलांच्या बरोबर असताना रानात पाणी नव्हते. साईबाबांनी आपला सटका जमिनीवर आपटताच त्याच क्षणी खड्डा पडून तेथे पाणी प्रगट झाले. केवढी सत्ता पंचमहाभूतांवर होती साईबाबांची ! (अध्याय ५)




शिरडीत एकदा अचानक मेघ-गर्जनेसह सोसाट्याचा वादळ-वारा सुरू होऊन सर्व जलमय झाले. काही केल्या मुसळधार पाऊस थांबेना. प्रलय होण्याची वेळ आली. सर्वजण मशिदीच्या आश्रयाला आले. त्यावेळी साईबाबांनी प्रचंड आरोळ्या देऊन वरूणाला शांत केले. थोड्याच वेळात पाऊस-वादळ शमले. सर्वजण आनंदाने साईबाबांना दुवा देत आपापल्या घरी परतले. (अध्याय ११)

अशाप्रकारे साईबाबा जलदेवताही आहेत, याचा अनुभव येतो.

श्री साईसच्चरितातील नववे व अतिशय महत्त्वाचे असे साईरूप म्हणजे 'माया देवी'चे, जिचा उल्लेख अध्याय ६,१३,२३,२७,३२,३७,३९,५० इत्यादींमधून आलेला आहे.

साईबाबा आपल्या भक्तांना सदैव सांगतात :- सतत माझे स्मरण करीत रहा; नाही तर जर मला विसरलात तर ही मायादेवी तुम्हाला फटकारे मारून मोहजालात गुंतवेल, जीवन दुःखमय करेल. माया हे माझेच रूप आहे. तिने तमोगुणापासून जड, रजोगुणापासून चैतन्य व सत्त्वगुणापासून सत्-चित्-आनंद या अवस्था निर्माण केल्या. अशी ही त्रैगुण्याने नटलेली मायादेवी सर्व जीवांवर सत्ता गाजविते. मात्र, सर्व संतांच्या आज्ञेत ती राहते. जर मायेतून तरून जावयाचे असेल तर हृदयात साईबाबांना स्थान द्या !





ही मायादेवी परमेश्वराची आदिमाया असल्याने ब्रह्मादिकांपासून सर्वांची त्रेधातिरपीट उडवते. मग सर्वसामान्यांची तर अवस्था कठीणच. यातून मुक्त होण्यासाठी "साई स्मरा। साई भजा।" म्हणजे साईबाबा प्रसन्न होतील, मायेचे निरसन करतील. प्रत्येक जीव मायेत घोटाळतो, त्यातच तो अनिवार गोते खातो. त्या जीवाला ही मायादेवी हीनदीन करून टाकते.

जीवाच्या अज्ञान अवस्थेतून ही मायादेवी निर्माण होते. अविद्या, अज्ञान हे तिचे वैभव. संशय, विकल्प, भिती यांमुळे मुळात शिवस्वरूप असलेला, ज्ञानी असलेला - अज्ञानी जीव होतो. त्यामुळे साधा दोरही सर्प भासतो. म्हणून, साईबाबांच्या नामस्मरणात, सहवासात राहून जीवाला निर्भय केले पाहिजे. सर्पाप्रमाणे ही मायादेवी वाटोळी-घाटोळी असते. ती जीवाला आतून-बाहेरून पूर्णपणे कवटाळते. मग तिचा गुंता सोडवणे फार कठीण जाते. अशी ही लटकी मायादेवी चेटकिणीप्रमाणे ज्ञानियांना क्षणोक्षणी फसविते. भक्तांना चुटकीवर नाचवते. जर तिच्यात गुंतायचे नसेल, तर "मी-माझे" हा नसता व्याप पाठीशी लावून घेऊ नये.

माझा देह, माझी मुले-बाळे ही सर्व क्षणिक माया आहे, अगदी दुपारच्या क्षणभर छायेप्रमाणे. या मायेची गुंती बांधू नये, असे वाटत असेल, तर अनन्यभावे साईबाबांच्या चरणांशी शरणागती पत्करावी. कारण, या मायादेवीचा अंत व्हावा म्हणून अनेक वेद, शास्त्री, पंडितांनी खूप प्रयत्न केले; अखेर त्यांनीही हात टेकले; मग सर्वसामान्यांनी काय करावे ? तर, प्रत्येक भूतमात्रातील भगवंत पहावा. प्रत्येक जीवात चैतन्यरूपाने जी परमेश्वरीय शक्ती आहे, ईशतत्त्व आहे ते जाणून घ्यावे. तेच ईशतत्त्व सर्वकर्ता-करविता आहे. ते देहात नसेल, तर देह म्हणजे प्रेत, हे अंत:करणपूर्वक समजून घ्यावे. म्हणजे मग तो जीव मायादेवीच्या जंजाळात न अडकता तरून जाईल. यासाठी समर्थ साईबाबा आपल्या भक्तांना सावरण्यासाठी सदैव तत्पर असतात. म्हणूनच, त्यांची श्री साईसच्चरितात नऊ देवतांची रूपे आढळतात.

समर्थ साईबाबांनी या नऊ देवता धारण करून जीवाचा अहंकार, षड्रिपू यांना तिलांजली देऊन शिवस्वरूप बनविण्याचा प्रयत्न केला. आपले अवतारकार्य विजयादशमीला - दसऱ्याला संपवून शिलंगण साधले. नवदुर्गांचे अवतार घेऊन आपले अवतारकार्य पूर्णत्वाला नेले. एवढेच नव्हे, तर जाता जाता भक्तांना अभय वचन दिले :-

**"जरी हे शरीर गेलो मी टाकून ।**
**तरी मी धावेन भक्तांसाठी ।"**

म्हणून, आपण साऱ्यांनी सदैव त्यांचे स्मरण करून आपला उद्धार करून घेऊ या !

❑❑❑

# साईबाबांचे गीता भाष्य-प्रवचन

- वसंत दळवी



**'श्री साईसच्चरित' हे स्वत: बाबांनीच हेमाडपंतांना केवळ निमित्त करून लिहिले आहे. या पोथीत अध्याय ३९ व ५०मध्ये भगवद्गीतेच्या ''तद्विद्धि प्रणिपातेन...'' या श्लोकावर बाबांचे प्रदीर्घ भाष्य-प्रवचन समाविष्ट आहे. केवळ पोथी म्हणून श्री साईसच्चरित न वाचता त्या पोथीचे चिंतन-मनन करणाऱ्या साधकांसाठी या भाष्याच्या अनुषंगाने साईभक्त वसंत दळवी यांनी व्यक्त केलेले काही विचार. यासंदर्भात विधायक चर्चा-चिंतन व्हावे, या दृष्टीने आपणही आपले चिंतनात्मक विचार लिहून 'साईलीला'कडे पाठवावेत.**

**यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।**
**अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ।।**

**- गीता ४:७**

**ज्या** ज्यावेळी धर्माचा ऱ्हास होतो त्या त्यावेळी मी पुन: धर्मस्थापना करण्यासाठी स्वत: जन्म घेतो, हे भगवंताचे अवतारकार्य पृथ्वीतलावर युगानुयुगे चालू आहे. माणसाने पशू बनू नये, आपले मनुष्यत्व विसरू नये म्हणून परमेश्वर संत-महात्म्यांच्या रूपाने देह धारण करीत असतो. प्रेम, करुणा, दया ही देवत्वाची लक्षणे आहेत. माणूस विषयाधीन होतो आणि आपले देवत्व विसरतो, सत्ता-संपत्ती, मान-लौकिक मिळविण्यासाठी स्वार्थी बनतो, आत्यंतिक लोभी होतो, नीच कर्मे करण्यास - अधर्माने वागण्यास त्याला दिक्कत वाटत नाही, तेव्हा धर्माला ग्लानी येते व अधर्म बळावू लागतो आणि अशाप्रकारे माणसाची पशुत्वाकडे नेणारी ही वाटचाल थांबविण्यासाठी परमेश्वर अवतार धारण करतो. हजारो वर्षे हे त्याचे कार्य अविरत चालू आहे, माणसाने आपले माणूसपण विसरू नये म्हणून.

ऋग्वेदात इंद्र आपल्या मायेने विविध रूपे घेतो, असा उल्लेख आहे. पुराणांतून परमेश्वर, त्याचे अवतार, उद्देश, कार्य यांची कल्पना स्पष्ट केलेली आढळते. भगवद्गीतेतही हा विचार मांडला आहे. युद्धभूमीवर मोहग्रस्त अर्जुनाला उपदेश करताना आपल्या अवतारांचे रहस्य भगवान श्रीकृष्णाने सांगितले की, ''**धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे**''।। ''दुर्जनांच्या नाशासाठी, सज्जनांच्या रक्षणाकरिता व धर्माची संस्थापना करण्याकरिता मी युगे युगे अवतार घेत असतो.'' गीतेच्या ४थ्या अध्यायात पुनर्जन्म, कर्मसिद्धांत, अवताराचे गुह्य ज्ञानानेच जाणता येते, हे सांगताना सद्गुरु व आत्मज्ञान मिळविण्याकरिता त्यांची

कपा कशी प्राप्त करावी, याचे सुंदर विवेचन केले आहे. श्री ज्ञानेश्वरमाउली सांगते, भगवंत निर्गुणातून साकार होतो, अव्यक्तामधून व्यक्त होतो; कारण, **''जें धर्मजात आघवें। युगायुगी म्या रक्षावें। ऐसा ओघु हा स्वभावें। आद्यु असे'' ॥ ज्ञानेश्वरी ४:४९ ॥** ''त्यावेळी माझा जन्मरहितपणा आणि अव्यक्त स्थिती मी त्या अवतारकाळात आठवीत नाही. पण, जे काम, क्रोध, भय यांपासून मुक्त झाले आहेत, मी अविकारी आहे, हे ज्यांना समजते ते विवेकी होत. तेच श्रेष्ठ आणि परमयुक्त.'' **''माझें अजत्व जन्मणें। अक्रियताचि कर्म करणें। हें अविकार जो जाणे। तो परममुक्त ॥४:५८॥ तो चालिला संगे न चळे। देहींचा देहा नाकळे। मग पंचत्वीं तंव मिळे। माझांचि रूपीं'' ॥४:५९॥** अवतारांच्या लीला अबोध असतात. अवताररहस्य आकलन होऊ शकेल असे ग्रंथ, त्यांतील कथा, उपदेश मन:पूर्वक अभ्यासावेत.

अवतार याचा वाचिक अर्थ आहे, ''खाली उतरणे''. 'तृ' धातूला 'अव' उपसर्ग लागून बनलेला हा शब्द विशेषत: देवांचे पृथ्वीतलावर अवतरण (आगमन) या अर्थाने प्रचलित आहे. अवतारांना देश, कालादि मर्यादा असत नाहीत. सामाजिक स्थैर्याची बिघडलेली घडी सुव्यवस्थित करताना ते कालबाह्य रूढी बाजूस काढतात. त्याऐवजी नवा आचारधर्म स्वत: आचरून लोकांसमोर ठेवतात. पुराणे लक्षपूर्वक अभ्यासली, तर कथांतून सांगितलेले तत्त्व-दर्शन होते. पूर्वी होऊन गेलेल्या अवतारांच्या लीलांची वर्णने त्यांत आहेत; त्याचप्रमाणे पुढे (भविष्यात) होणाऱ्या अवतारांची वर्णनेही आहेत. युग आणि मन्वंतरांशी अवतार जोडलेले आहेत. अवतार हे ब्रह्माचीच रूपे होत. ब्रह्म सर्वव्यापी आहे. सर्व भौतिक पदार्थांत पंचमहाभूतांप्रमाणे आत-बाहेर सर्वत्र भरलेला आहे. भगवंत पृथ्वीवर येऊन ज्या लीला करतात त्या भूतांच्या अभ्युदयाकरिता असतात. भगवंताला उच्च-नीच योनीत जन्म घेतल्याने कमीपणा वा मोठेपणा येत नाही. उच्चता व नीचता हे गुण बुद्धीचे आहेत; तर परमेश्वर **''यो बुद्धे परतस्तु स:''**, म्हणजे गुणातीत व बुद्धीच्या पलीकडला आहे.

प. पू. दासगणूंनी श्री साईनाथ स्तवनमंजरीमध्ये अवतारांचे सुंदर वर्णन केले आहे. श्री साईबाबांच्या अवतारसंदर्भातील ओव्यांत ते म्हणतात, **''प्रत्येक संवस्तरी। जुनें जाऊनि नवें वारी॥ येता पात्राभींतरी। तोच न्याय तुम्हां ठाया ॥४३॥.... ऐसे बहुत आजवरी। प्रत्येक शतकामाझारीं॥ पूर आले वरच्यावरी। तें वर्णण्या अशक्य मी ॥४७॥ या सांप्रतच्या शतकांत। संतरूप गोदेप्रत॥ आपण पूर आलात। साईनाथा निश्चयें ॥४८॥''** श्री साईबाबांचा अवतार व त्यांच्या योगसामर्थ्याचे वर्णन करताना म्हणतात, **''जगाचे आद्यकारण। जे कां विमलचैतन्य। तें तुम्हीच आहा दयाघन। विश्व हा विलास तुमचाचि ॥१७॥ आपण जन्मरहित मृत्युही ना आपणांप्रत तेंच अखेर कळून येत। पूर्ण विचारें शोधितां ॥१८॥''** तीन ओव्यांत बाबांच्या लीला, त्यांचे कार्य व योगसामर्थ्य यांचे पूर्ण चित्र समोर उभे करण्याचे सामर्थ्य अलौकिक आहे. **''जड-जीवांच्या उद्धारार्थ। आपण आला शिर्डीत॥ पाणी ओतून पणत्यांत। दिवे तुम्ही जाळिले ॥९९॥ सवा हात लाकडाची। फळी मंचक करून साची॥ आपुल्या योगसामर्थ्याची। शक्ति दाविली भक्तजनां ॥१००॥ वांझपणा कैकांचा। तुम्ही केलात हरण साचा॥ कित्येकांच्या रोगांचा। विमोड केलात उदीने ॥१०१॥''**

१९व्या शतकाच्या मध्यात श्री साईबाबा प्रगट झाले. आपल्या अवतारकार्याकरिता शिरडी हे लहानसे खेडेगाव निवडले. जीर्ण-शीर्ण पडक्या मशिदीत वास्तव्य करून अनेक लीला केल्या. मशिदीला ते 'द्वारकामाई' म्हणत असत. द्वारकामाईतील हा भगवान आपले खरे स्वरूप कोणाला कळू नये म्हणून कधी उग्ररूप धारण करीत असे. पण, बाबा पूर्ण दयाळू होते. दया, प्रेम, करुणा असा त्रिवेणी संगम त्यांच्याठायी होता. भक्तांकरिता ते आले. भक्तांची

संकटे निवारण करून, त्यांना भागवत धर्माची शिकवण देऊन त्यांना ते भक्तिमार्गाला लावीत. श्री साईबाबांनी सांगितल्याप्रमाणे आज भक्त-भाविक त्यांच्या दर्शनासाठी मुंग्यांसारखी रांग लावताना दिसतात. आपल्या मनोकामना, वेदना सांगतात. दुःख, संकटे त्यांच्या चरणी ठेवून प्रार्थना करतात. प्रार्थनेला साद मिळाली नाही वा कामना पूर्ण झाली नाही, असे होत नाही. त्यांचे भक्तांना अभिवचनच आहे, **''जाणा येथें आहे साहाय्य सर्वांस। नव्हे हें अन्यथा वचन माझें ।।''** बाबांना भक्तांकडून हवा आहे. शरणागत भाव आणि भक्ती.

अत्यंत संन्यस्त वृत्तीने ते राहत असत. नेमक्या ठराविक घरी भिक्षेला जात. लहर लागली, तर सर्वांचा काला करून खात किंवा भिक्षा कोळंब्यात ठेवून देत, पशू-पक्षी, किडा-मुंगी यांच्या क्षुधाशांतीसाठी ! लोकांत राहून एकांती असत. लोकांच्या गढूळ संसारी जीवनात त्यांचे जीवन कमळासारखे होते. क्वचित कोपायमान होणारे बाबा संतांसारखे मऊ हृदयाचे होते. त्यांचे अंतःकरण दया, प्रेम, करुणा, क्षमा, शांतीने भरलेले होते. लोकांच्या कल्याणाची, त्यांच्या अभ्युदयाची त्यांना तळमळ होती. **''बुडती जन पाहवेना डोळा''**, अशी त्यांची स्थिती असे.

श्री साईबाबा योगी होते, ज्ञानयोगी होते. ज्ञानोत्तर भक्ती आणि कर्मे कशी करावीत, याचा आदर्श स्वतः आचरण करून त्यांनी मुमुक्षू भक्तांपुढे ठेवला. त्यांनी कोणाच्या श्रद्धेला धक्का लावला नाही, तरी कालबाह्य व शुद्ध भक्तीच्या आड येणाऱ्या रूढींना, आचार-विचारांना प्रोत्साहनही दिले नाही. लोकांच्या मनात परमेश्वराविषयी प्रेम निर्माण करणारा उपदेश ते करीत. कथा-दृष्टांतांतून, साध्या-सोप्या भाषेत जीवन जगण्याची कला त्यांनी शिकवली... शरणागत भावाने ईश्वराला शरण जा ! भक्तिभावाने त्याचे नित्य स्मरण करा ! अढळ श्रद्धा ठेवून वाट पहा ! तो तुमचे कल्याण करील. जी काही कर्मे कराल ती त्याला अर्पण करा ! कर्मे कोणाला चुकत नसल्याने शुद्ध, सात्त्विक कर्मे करा ! नीतीने वागा ! बाबा पुढे सांगत, ''कर्तव्य आपण करावे; पण ते करीत असताना ईश्वराचा विसर पडू देऊ नये.'' **''कर्तव्य आपण करावे । कर्तृत्व ईश्वरा द्यावें । फलही त्यासीच समर्पावे । अलिप्त आपण रहावया ।।'' भक्तलीलामृत ३२:१०७ ।।** हेच भगवान श्रीकृष्णांनी गीतेत सांगितलेले 'कर्मकौशल्य'. अशी कर्मे मग कर्त्याला बंधनकारक होत नाहीत. याचे विस्तृत विवेचन बाबांच्याच शब्दांत दोन ग्रंथांतून केलेले आहे. दाभोलकरकृत 'श्री साईसच्चरित' व दासगणू महाराज लिखित 'भक्त व संतलीलामृत' हे ते दोन ग्रंथ. श्री साईसच्चरिताची पारायणे आज घरोघरी वैयक्तिकरीत्या, मंदिरांतून, सभामंडपांतून सामूहिकरीत्या होत असतात, एवढे त्याचे माहात्म्य आहे. कारण, बाबांनीच म्हटले आहे, ''तू निमित्त हो !'' श्री साईबाबांनी अशी आज्ञा दिली व उदीचा प्रसाद देऊन, मस्तकी वरदहस्त ठेवून आशीर्वाद देत म्हणाले, **''कथावार्तादी अनुभवांचा । संग्रह साचा करावा ।।७५ ।। दफ्तर ठेवा बरें आहे । त्याला माझें पूर्ण सहाये । तो तर केवळ निमित्त पाहें । लिहावें माझें मींचि कीं ।।७६ ।।** - अ.२

श्री साईबाबा संस्थानचे अध्यक्ष श्री. सुकथनकर यांनी श्री साईसच्चरितातील 'निमित्तमात्र'मध्ये एका वाक्यात या ग्रंथाचे माहात्म्य वर्णन केले आहे :- ''हा महान ग्रंथ जीवनपथावर मार्गक्रमण करणाऱ्या साऱ्यांनाच मार्गदर्शक आहे. सांसारिक व पारमार्थिक विचारांचा, अनुभवांचा तर तो अनमोल, चिरंतन ठेवा आहे.'' बाबांच्या अखंड सहवासात असलेले हरिभाऊ दीक्षित उपोद्घातात अवतारासंबंधी लिहिताना म्हणतात, ''महाराजांकडे येणाऱ्यांमध्ये सकाम भक्तांचेच प्रमाण फारमोठे असे; पण महाराज त्यांची कामना पुरवून त्यांचे मन आत्यंतिक हिताकडे बेमालूमपणाने वळवीत. महाराजांचा अवतार लोकांच्या उद्धारासाठीच होता... बैठकीचे वेळी गोष्टीरूपाने महाराज बोध करीत. महाराजांच्या बोलण्यात तेथे त्यावेळी असलेल्या निरनिराळ्या मंडळींच्या मनात घोळत असलेल्या निरनिराळ्या बाबींसंबंधाने खुलासे होऊन जात.... त्यांचा उपदेश मुख्यतः नैतिक असे.



शिष्याची भूमिका शुद्ध करून मग त्यात ज्ञानाचे बीज पेरावयाचे ही सद्‌गुरुची शास्त्रोक्त वहिवाट आहे; तसेच महाराजही करीत; म्हणून त्यांचा उपदेश सर्वसाधारण नीतितत्त्वाचाच आहे.'' 'साईलीला'चे माजी संपादक श्री. नागेश सावंत म्हणतात, ''श्री साईबाबा प्रत्यक्ष परमेश्वर असून स्वत: मनोभावाने केलेली प्रार्थना त्यांना पोहोचते; त्यासाठी मध्यस्थांची आवश्यकता नाही, याचे प्रत्यंतर श्री साईबाबांच्या हजारो भक्तांना आहे. त्यांच्या समाधीचे दर्शन, त्यांचे स्मरण, मनन, वाचन वगैरे करीत असल्यास हा अनुभव खात्रीने येतो.'' तर, गुरुभावाविषयी बाळकृष्ण देव प्रस्तावनेत म्हणतात, ''गुरुचरित्र लिहिणे ही गुरुसेवाच आहे. श्री साईबाबा परमात्मास्वरूप आहेत, तेव्हा गुरुचरित्राप्रमाणे श्री साईसच्चरिताचे नित्य अध्ययन व पठण होऊन त्याची शेकडो पारायणे व सप्ताह व्हावेत, ही ग्रंथकाराची इच्छा फलद्रुप झालेली आज अनंत पटीने दिसत आहे.'' श्री साईबाबांच्या अवतारासंदर्भात व सद्‌गुरु म्हणून प्रगट केलेले हे विचार अत्यंत बोलके व सारभूत असेच आहेत. श्री साईबाबा प्रापंचिकांना नीतिसंदर्भात उपदेश करीत, तर मुमुक्षूंना तन्मयतेने (आत्म) ज्ञानाचा बोध करीत.

भगवद्‌गीतेत चार प्रकारचे भक्त असतात, असे सांगितले आहे. **''भक्त चौघे सदाचारी भजती मज अर्जुना । ज्ञानी तसेचि जिज्ञासू हितार्थी आणि विठ्ठल ।।'' गीताई, ७:१६** ।। सर्व भक्त उत्तम आहेत; पण ज्ञानी भक्त माझा आत्मा आहे. ज्ञानी भक्त होण्यास अनेक जन्मांची पुण्याई, तपश्चर्या पाठीशी हवी. सद्‌गुरु आत्मबोधाचा उपदेश देतात. तेव्हा, या जन्मी सद्‌गुरुची भेट घेऊन आत्मबोध करून घ्यायला हवा. ईश्वरोपासनेची कास धरायला हवी. अंत:करण स्वच्छ, निर्मळ करणारीच कर्मे केली पाहिजेत. श्री साईबाबांचा अंत:करणशुद्धीविषयी अट्टाहास असे.

म्हणूनच श्री साईबाबांना प्रामाणिक, सत्प्रवृत्त, निरहंकारी माणसे आवडत. गृहस्थाश्रम स्वीकारल्यावर व्यक्तीवर बंधने येतात. ममतेने, आसक्तीमुळे तो त्यात आणखी गुरफटतो. दु:खी-कष्टी होतो. देवाला, दैवाला दोष देतो. आपले हे भोग आपणच आपल्या कर्मांनी निर्माण केले आहेत, हे विसरतो. अशा आर्त जीवांना बाबा सांगत की, ही संकटे, दु:खे प्रारब्धानुसार येतात. तळमळ व आक्रोश न करता ती भोगा ! देव दयाळू आहे. त्याला शरण जा ! तो मार्गदर्शन करील आणि भोग भोगण्यास शक्ती देईल. अभय देतात, **''जाणा येथें आहे साहाय्य सर्वांस । मागे जें जें त्यास तें तें लाभे ।।''** त्यांना हवी आहे भक्ती व शरणागत भाव. आर्त, जिज्ञासू, मुमुक्षू सर्वांचे हे आश्रयस्थान आहे. सर्वार्थाने भक्तांची ती माउली आहे. भाविकांची संकटातील सावली आहे. प्रार्थनेला साद देणारा तो देव आहे. ज्या भावाने जो भजेल तसे त्याला मिळेल. म्हणून **''ज्याचे मनी वसला साई । त्याला नाही काही कमी ।''**

'वादळ-वाऱ्यातील दीपस्तंभ' या लेखात श्री. ताठे यांनी संतांच्या कार्याची महत्ता थोडक्या पण वेचक शब्दांत उत्तम रीतीने सांगितली आहे. ते म्हणतात, ''संतांची दयाबुद्धी, त्यांची ईश्वरनिष्ठा, त्यांचा साधेपणा, त्यांचा निग्रह, सुखदु:खे समान मानण्याची त्यांची दृष्टी, मानापमानातील त्यांची वृत्ती या साऱ्याच गोष्टी आपणास आजही अनुकरणीय आहेत.... संत केवळ कोरडा उपदेश करीत नाहीत, तर प्रथम कृती करतात.'' बाबांचा या १९-२०व्या शतकातील अवतार संताचा होता. श्री साईबाबा योगी होते, ज्ञानी होते, संन्यासी होते, तरी सामान्य प्रापंचिक भाविक भक्तांसाठी महान संत होते. **''जगाच्या कल्याणा संतांच्या विभुती''**, असा कृतिशील आदर्श समोर ठेवला.

संपादकीयमध्ये श्री. ताठे यांनी गुरु आणि सद्‌गुरुविषयी फार सुंदर विचार मांडले आहेत. ते म्हणतात, ''गुरु-सद्‌गुरु हे शोधून प्रयत्नाने मिळत नसतात. प्रयत्नाने भोगवस्तू मिळतात. गुरुसारखा दिव्यतत्त्वबोध हा योगानेच लाभतो. या योगालाच पूर्वसुकृत म्हणतात.... गुरु आपोआप भेटतो. शोधून सापडत नाही.... श्री साईबाबांचे आगळे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी ना आपला शिष्यपरिवार निर्माण केला, ना गादी-उत्तराधिकारी तयार केले.... साईबाबांचे हे



वेगळेपण एकदम उठून दिसते. हा असा सद्गुरु की, ज्याने कोणासही शिष्य केले नाही; पण लाखो भक्त त्यांना आपले सद्गुरु मानतात. साईबाबांच्या भक्तांना अन्य बाजारू गुरुची गरज नाही. आपली आई एक, आपला पिता एक, तद्वतच आपले सद्गुरु एक आणि ते म्हणजे साईबाबा ! हा भक्तांचा अतूट विश्वास आहे.''

गुरु हा संस्कृत शब्द आहे. 'गु' या पदाचा अर्थ आहे अंध:कार व 'रु' चा अर्थ आहे विनाश. अज्ञान अंध:काराचा जो विनाश करतो तो गुरु शिष्याला 'सत्'चा उपदेश देतो. शोचनीय अवस्था प्राप्त झालेल्या जीवाला गुरु आत्मविस्मृती घालवून ज्ञानाचा प्रकाश दाखवतो. देह म्हणजे 'मी' नव्हे याचे ज्ञान देतो. त्याला संसाराच्या व जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सुटण्याचा मार्ग दाखवितो.

सर्वसाधारणपणे व्यावहारिक व पारमार्थिक मार्गदर्शन करणाऱ्या सर्व व्यक्तींना गुरु म्हणून संबोधिले जाते. त्यानुसार गुरुगीतेत सात प्रकारच्या गुरूंचे वर्णन आहे. गुरुगीतेत सांगितलेल्या गुरूंमध्ये प्रथमावस्थेत ज्या व्यक्ती येतात त्यांना 'व्यावहारिक गुरु' म्हटले आहे. त्यात वडिलधारी माणसें, शिक्षक व इतर मार्गदर्शक व्यक्तींचा समावेश होतो. जीवन जगण्यास आवश्यक असणारे ज्ञान हे गुरु आपल्या कुवतीनुसार देतात. त्यांना 'सूचक' गुरु म्हणून संबोधिले आहे. दुसऱ्या प्रकारात 'वाचक' गुरु येतात. हे गुरु शिष्याच्या मनावर चांगले संस्कार रूजवतात. जीवनात नीतिमूल्यांचे महत्त्व व आवश्यकता ते शिष्याच्या मनावर बिंबवतात. त्यापुढील पायरीवर भेटणाऱ्या गुरूंना 'बोधक' गुरु म्हणून संबोधिले आहे. वेगवेगळ्या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी हे गुरु मंत्रज्ञान देतात. या गुरूंमध्ये 'निषिद्ध' गुरूंचा समावेश होतो. या गुरूंना 'निषिद्ध' गुरु म्हणण्याचे कारण, ते शास्त्रविरुद्ध शिकवणीचे मंत्रोपदेश शिष्यांना देतात. नीच व अधम कृत्यांच्या पूर्ततेसाठी असलेले मंत्र हे गुरु शिकवतात. अशा गुरूंपासून खऱ्या साधकाने सावध राहून दूर राहणेच इष्ट होय ! त्यानंतर येतात 'विहित' गुरु. साधकाच्या पूर्वजन्मींच्या पुण्याईने त्यांच्याशी भेट होते. **''बहुत सुकृताची जोडी । म्हणूनि विठ्ठल आवडी''**, अशी ओढ सात्त्विक वृत्तीमुळे लागते. देवाच्या भेटीची तळमळ लागते. साधक अंत:करणशुद्धीचे उपाय शोधत असतो, त्याचवेळी देवाला शरणागत भावाने प्रार्थना करीत असतो की, मला मार्गदर्शन हवे आहे. मग परमेश्वर 'विहित' गुरुशी गाठ घालून देतात. 'विहित गुरु' अशा सच्छिष्याला शास्त्रसंमत आचार सांगून चित्तशुद्धीचे उपाय सांगतात. भक्तिभाव वाढवणारी शिकवण व उपासना देतात. अशाप्रकारे ते शिष्याची अध्यात्म मार्गावरील वाटचाल सुलभ होण्यास मदत करीत असतात. अशी चित्तशुद्धी झाल्यावर ईशकृपेने 'करण' गुरूंची भेट होते. हे सर्वार्थाने सद्गुरु असतात. उपनिषदांतील तत्त्वांचा बोध ते शिष्याला करून देतात. तत्त्वांचे मनन, चिंतन कसे करावे, याचा बोध देतात. साधकाची प्रगती एव्हाना जिज्ञासू, मुमुक्षू या दशेतून अध्यात्माच्या वरच्या पायरीवर झालेली असते. आता तो आत्मबोधाचा अधिकारी झालेला असतो. असे अधिकारी सच्छिष्य मोजके आणि नेमके असतात. त्यांना आत्मबोधाचे ज्ञान करून देणारे गुरु हे 'परम' गुरु असतात. असे आत्मसाक्षात्कारी, ज्ञानी सद्गुरु हे 'अंतिम' सर्वश्रेष्ठ गुरु होत. हे सद्गुरु जो मार्ग दाखवितात व मंत्रोपदेश देतात तो अत्यंत फलदायी व उच्चावस्थेत नेणारा असतो. हा मार्ग सद्गुरुगणिक वैशिष्ट्यपूर्ण असतो. तरी सर्वांचे साध्य एकच असते, 'मोक्षप्राप्ती'. केवळ आत्मज्ञानाने तिचा लाभ होऊ शकतो.

आत्मबोधाचा अधिकारी होण्यासाठी पूर्वजन्मीची पुण्याई हवी. अशी व्यक्ती सात्त्विक वृत्तीची असते. देवाकडे मन वळलेली असते. कारण, पूर्वजन्मींच्या सत्कर्मांनी व साधनेने अंत:करण निर्मळ व शुद्ध झालेले असते. चित्तशुद्धी ही अध्यात्म मार्गातील पहिली पायरी आहे. श्री साईबाबांच्या सद्गुरु म्हणून केलेल्या उपदेशांचे हेच मर्म आहे. गीतेच्या अ. ४।३४ श्लोकात सांगितलेल्या शिष्याची पात्रता अंगी बाणण्यास बाबांची शिकवण मौलिक आहे. श्री साईबाबा चित्तशुद्धीची साधने सांगताना चांदोरकरांना म्हणतात, ''नाना, मी सांगतो ते चित्त एकाग्र करून ऐक ! अवधानपूर्वक ग्रहण कर ! जेणेकरून तुम्हा